दि. २५ जुलै, २०२२

# नागरिकाची सनद

## अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

## महाराष्ट्र शासन

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दूरध्वनी क्र .०२२-२२७९३०५०/३०५३

**सचिव**
**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**
**महाराष्ट्र शासन**

# प्रस्तावना

राज्यातील दारिद्र्यरेषेखालील आणि दूर्गम भागातील पात्र कुटुंबांना निवडक जीवनावश्यक वस्तू सवलतीच्या दरामध्ये उपलब्ध करुन देण्यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्था हे एक माध्यम आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्था ही केंद्र व राज्य शासन यांच्या संयुक्त जबाबदारीने चालविली जाते. या योजनेची माहिती सर्व नागरिकांना असणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच सदर योजना प्रभावीपणे व पारदर्शकतेने राबविण्यासाठी आपला म्हणजेच नागरिकांचा सहभाग अत्यंत मोलाचा आहे.

या विभागामार्फत देण्यात येणा-या विविध प्रकारच्या लोकोपयोगी सेवा, त्याचे निकष, कालमर्यादा तसेच तक्रार निवारण पध्दत याबाबतची माहिती नगरिकांना व्हावी यासाठी विभागाची  नागरी सनद तयार करण्यात आली आहे. त्यामुळे प्रशासन अधिक लोकाभिमुख, पारदर्शी व अधिक बळकट होईल अशी अपेक्षा आहे. जीवनावश्यक वस्तुंचा पुरवठा, ग्राहक संरक्षण व वजन मापे कायद्याची अंमलबजावणी, शेतक-यांना त्यांच्या धान्याला योग्य हमीभाव मिळावा यासाठी आधारभूत योजनेखाली धान्य खरेदी ही प्रमुख कार्ये पार पाडतांना त्यात नागरिकांचा सहभाग मिळण्याच्या दृष्टिने या नागरी सनदेतील माहिती निश्चितच उपयुक्त ठरेल.

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून व संगणकीकरणाच्या माध्यमातून सार्वजनिक वितरण व्यवस्था अधिक प्रभावी, परिणामकारक व सक्षम करावयाची शासनाची तयारी आणि त्याला नागरी सनदेच्या माध्यमातून अधिक सशक्त करण्याच्या हेतूने नागरिकांच्या प्रत्यक्ष सहभागाची जोड देऊन सदर यंत्रणा लोकाभिमुख, प्रतिसादशील व गतिमान होईल, याची मला खात्री आहे.

VBWaghmare

दि. २५ जुलै, २०२२

( विजय वाघमारे )
सचिव
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

## अनुक्रमणिका


| क्र. | विषय | संबंधित कार्यासन | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| | **भाग-१ (अन्न व नागरी पुरवठा उपविभाग)** | | |
| | विभागाचे उद्दिष्ट व संरचना | | ३ |
| १ | राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम-२०१३ | नापु-२२ | ४-६ |
| २ | जीवनावश्यक वस्तु अधिनियम-१९५५ | नापु-२१ व २३ | ६-७ |
| ३ | अन्नधान्य वितरणाची सुधारीत पध्दत | नापु-१६अ | ७ |
| ४ | शिधापत्रिका | नापु-२८ | ७-१० |
| ५ | रास्तभाव/शिधावाटप दुकाने | नापु-३१ | ११-१६ |
| ६ | पेट्रोल पंप व गॅस एजन्सी | नापु-२७ | १६ |
| ७ | केरोसिन परवाना मंजूर करण्याची कार्यपध्दती | नापु-२७ | १६-१७ |
| ८ | सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संगणकीकरण | संगणक कक्ष | १७-१९ |
| ९ | शिवभोजन | नापु-१७ | १९-२० |
| १० | साखर | नापु-१७ | २०-२१ |
| ११ | महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम -२०१५ | नापु-१२ | २१-२२ |
| १२ | जिल्हा तक्रार निवारण अधिकारी | नापु-२२ | २२ |
| | विवरणपत्र १ ते ४ | नापु-२३ व २७ | २३-२८ |
| | **भाग-२ वैधमापनशास्त्र यंत्रणा** | | |
| १ | अ) वजन वा मापांची पडताळणी व मुद्रांकन | ग्रासं-३ | २९ |
| | आ) वजन माप विषयक परवाने | ग्रासं-३ | २९-३० |
| | इ) वजन-माप आणि आवेष्टित वस्तू नियम विषयक तरतुदींचा भंग | ग्रासं-३ | ३०-३१ |
| | ई) वैधमापनशास्त्र यंत्रणेमार्फत करण्यात येणारी कार्ये, जबाबदार अधिकारी, कार्यपूर्ती कालावधी व याबाबत तक्रार विषयी अधिकारी यांचा तपशिल. | ग्रासं-३ | ३१-३२ |

| | | | |
|---|---|---|---|
| | **भाग - ३**<br>**(ग्राहक संरक्षण उपविभाग)** | | |
| २ | (अ) राज्य ग्राहक संरक्षण परिषद | ग्रासं-२ | ३३ |
| | (आ) जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद | ग्रासं-२ | ३३ |
| | (इ) ग्राहक संरक्षण अधिनियम,२०१९ ची अंमलबजावणी | ग्रासं-४ | ३३-३४ |
| | (ई) राज्य ग्राहक हेल्पलाईन | ग्रासं-२ | ३४ |

# भाग-१

# अन्न व नागरी पुरवठा विभाग

## उद्दिष्ट :-

जीवनावश्यक वस्तू रास्तभावात आणि ठराविक प्रमाणात उपलब्ध करून देण्याकरिता "सार्वजनिक वितरण व्यवस्था" या विभागामार्फत कार्यान्वित केलेली आहे.

## पुरवठा विभागाची संरचना:-

मंत्री
↓
राज्यमंत्री
↓
सचिव तथा पुरवठा आयुक्त

| | |
|---|---|
| ↓ | ↓ |
| नियंत्रक, शिधावाटप, मुंबई (मुंबई, ठाणे शिधावाटप क्षेत्र) | उपायुक्त (पुरवठा) (६ महसूल विभाग) |
| ↓ | ↓ |
| उप नियंत्रक, शिधावाटप | जिल्हा पुरवठा अधिकारी/अन्नधान्य वितरण अधिकारी |
| ↓ | ↓ |
| शिधावाटप कार्यालय | तहसील कार्यालय |

## सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे घटक:-

**मुंबई, ठाणे शिधावाटप क्षेत्र :-** नियंत्रक, शिधावाटप, मुंबई यांच्या नियंत्रणाखालील विभागीय परिमंडळ कार्यालये व त्याखालील विविध शिधावाटप कार्यालयांमधून हे काम चालते. मुंबई, ठाणे शिधावाटप क्षेत्रात पाच विभागीय परिमंडळ कार्यालये व त्याखालील ४६ शिधावाटप कार्यालये कार्यान्वित आहेत.

**जिल्हा स्तर :-** जिल्हाधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली पुरवठा विभागाचे काम जिल्हा पुरवठा अधिकारी व त्यांचे कार्यालय पाहते.

**तालुका स्तर :-** तहसील दाराच्या नियंत्रणाखाली पुरवठा शाखा हे काम पाहते. पुणे, नागपूर, सोलापूर अशा मोठ्या शहरांमध्ये तहसील दारांच्या कार्यालयाऐवजी झोनल ऑफीसमधून पुरवठा विभाग हे काम पाहते.

१)	**राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंमलबजावणी :-**

राज्यात दि. १ फेब्रुवारी, २०१४ पासून सदर अधिनियमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. सदर अधिनियमानुसार राज्यातील ६२.३ % (सुमारे ७ कोटी) लोकसंख्या अनुदानीत दराने धान्य मिळण्यास पात्र असून त्यात ७६.३ % (सुमारे ४.७० कोटी) ग्रामीण व ४५.३ % (सुमारे २.३० कोटी) नागरी लोकसंख्येचा समावेश आहे. सदर अधिनियमांतर्गत लाभार्थ्यांचे अंत्योदय अन्न योजना कुटुंब व प्राधान्य कुटुंब लाभार्थी अशा दोन गटात वर्गीकरण करण्यात आले आहे. सदर अधिनियमानुसार अंत्योदय अन्न योजनेतील कुटुंबांना प्रतिमाह प्रति शिधापत्रिका ३५ किलो अन्नधान्य व प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांना प्रतिव्यक्ती प्रतिमाह ५ किलो या प्रमाणात धान्य वितरीत करण्यात येते. सदर अन्नधान्य ₹ ३/- प्रतिकिलो या दराने तांदूळ, ₹ २/- प्रतिकिलो या दराने गहू व ₹ १/- प्रतिकिलो या दराने भरडधान्य वितरीत करण्यात येते.

राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ मधील कलम ८ नुसार पात्र व्यक्तीस अन्न/आहार न मिळाल्यास केंद्र शासन निश्चित करेल त्या कालावधीकरिता व पद्धतीनुसार सदर व्यक्ती राज्य शासनाकडून अन्नसुरक्षा भत्ता मिळण्यास हक्कदार असतील.

महिला सक्षमीकरण करण्याच्या हेतूने सदर अधिनियमातील कलम १३ मधील तरतूदीनुसार अनुदानित दरातील अन्नधान्यासाठी पात्र कुटुंबातील जेष्ठ महिला ही "कुटुंब प्रमुख" म्हणून ठरविण्यात आली आहे.

**राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत पात्र लाभार्थी निवडीचे निकष :-**

राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत पात्र लाभार्थी निवडीचे निकष पुढीलप्रमाणे:-

१. दि. १७.७.२०१३ च्या शासन निर्णयान्वये विहीत केलेले निकष पूर्ण करणाऱ्या दारिद्र्य रेषेखालील (पिवळी शिधापत्रिकाधारक) कुटुंबांचा अंत्योदय अन्न योजना कुटुंब गटात समावेश करण्यात येतो.
२. अंत्योदय अन्न योजनेत समाविष्ट न झालेल्या दारिद्र्य रेषेखालील (पिवळी शिधापत्रिकाधारक) कुटुंबातील सर्व सदस्य आणि दारिद्र्य रेषेवरील कुटुंबांतील केशरी शिधापत्रिकाधारकांपैकी ग्रामीण भागातील वार्षिक कौटुंबिक उत्पन्न ₹ ४४,०००/- पर्यंत व नागरी भागातील वार्षिक कौटुंबिक उत्पन्न ₹५९,०००/- पर्यंत असणाऱ्या शिधापत्रिकाधारकांचा प्राधान्य कुटुंबातील लाभार्थी या गटात समावेश करण्यात येतो.

दि. ६.७.२०१९ च्या शासन निर्णयान्वये राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमांतर्गत सवलतीतील दराने अन्नधान्याचा लाभ मिळण्याकरिता पात्र लाभार्थ्यांची निवड करण्याकरिता दि. ३०.६.२०१९ पर्यंतच्या शिधपत्रिका विचारात घेण्याच्या सूचना क्षेत्रीय कार्यालयांना देण्यात आल्या होत्या. आता दि. १५.९.२०२१ च्या शासन निर्णयानुसार उपरोक्त दि. ६.७.२०१९ चा शासन निर्णय रद्द करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयानुसार प्राप्त इष्टांकाच्या मर्यादेत वेळोवेळी उपलब्ध असलेल्या शिधापत्रिकाधारकांमधून राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमांतर्गत सवलतीतील दराने अन्नधान्याचा लाभ मिळण्याकरिता पात्र लाभार्थ्यांची निवड करण्याच्या सूचना क्षेत्रीय कार्यालयांना देण्यात आल्या आहेत. तसेच सर्व पात्र

लाभार्थ्यांकडून दि. १५.९.२०२१ च्या शासन निर्णयासोबतचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्नाबाबतचे हमीपत्र भरुन घेणे अनिवार्य करण्यात आले आहे.

राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत सवलतीच्या दराने अन्नधान्य देण्याकरिता शासनावर येणारा आर्थिक भार कमी होण्याच्या दृष्टीने तसेच योग्य व गरजू लाभार्थ्यांना सवलतीच्या दराने अन्नधान्याचा लाभ मिळावा या उद्दिष्टासाठी "अनुदानातून बाहेर पडा " (Opt Out of Subsidy) ही योजना सुरु करण्याचा निर्णय दिनांक १९.१०.२०१६ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

**राज्य अन्न आयोग :-**

महाराष्ट्र राज्यामध्ये दिनांक १ फेब्रुवारी, २०१४ पासून राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ ची अंमलबजावणी सुरू झालेली आहे. सदर अधिनियमातील कलम १६ (१) अन्वये अधिनियमाच्या अंमलबजावणीवर संनियंत्रण व पुनर्विलोकनाच्या प्रयोजनार्थ "राज्य अन्न आयोग" गठीत करण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्यानुषंगाने दिनांक ११ एप्रिल, २०१७ च्या अधिसूचनेद्वारे राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ (२०१३ चा २०) मधील कलम १६ (१) द्वारा प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन स्वतंत्र राज्य अन्न आयोग गठीत करण्यात आला आहे. श्री. अरूण देशपांडे, अध्यक्ष, राज्य अन्न आयोग यांच्या वयाची ६५ वर्ष दि. ६.६.२०२१ रोजी पूर्ण झाली असल्याने राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ च्या कलम १६(४) मधील तरतूदीनुसार त्यांचा सदर पदावरील कार्यकाल संपुष्टात आला आहे. अध्यक्ष, राज्य अन्न आयोग या पदावर नवीन नियुक्ती होईपर्यंत ॲड. महेश ढवळे, सदस्य, राज्य अन्न आयोग यांच्याकडे दि. २९.१०.२०२१ च्या शासन निर्णयान्वये अध्यक्ष पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे.

**महाराष्ट्र अन्नसुरक्षा नियम, २०१९:-**

- राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ च्या कलम ४० अन्वये सदर अधिनियमातील तरतूदींच्या अंमलबजावणीकरीता पूर्वप्रसिद्धीच्या अटीच्या अधीन राहून सदर अधिनियमाशी व केंद्र शासनाने केलेल्या नियमांशी सुसंगत नियम तयार करणे राज्य शासनास आवश्यक आहे. त्यानुसार महाराष्ट्र अन्नसुरक्षा नियम, २०१९ तयार करण्यात आले असून शासन अधिसूचना, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, दिनांक २४.५.२०१९ अन्वये असाधारण राजपत्रात प्रसिध्द करण्यात आले आहेत.

- केंद्रीय अन्नपूर्णा योजना

  राज्यात केंद्रीय अन्नपुर्णा योजनेची अंमलबजावणी दि. १ एप्रिल, २००१ पासून सुरू करण्यात आली. ही योजना १०० टक्के केंद्र पुरस्कृत आहे. या योजनेअंतर्गत ६५ वर्षे किंवा त्यावरील निराधार स्त्री/पुरुष यांना दरमहा १० किलो धान्य मोफत देण्यात येते.त्यामध्ये प्रामुख्याने ज्या व्यक्तींना केंद्र वा राज्य पुरस्कृत योजनेअंतर्गत निवृत्ती वेतन योजनेचा लाभ मिळत नाही, अशी व्यक्ती या योजनेसाठी पात्र आहे.

- कल्याणकारी संस्था, वसतीगृहे, आश्रमशाळा इत्यादी संस्थांना बीपीएल दराने धान्य वितरणाची योजना:-

  राज्यातील कल्याणकारी संस्थांना प्रत्येक लाभार्थ्यास दरमाह १५ किलो याप्रमाणे धान्याचे वितरण करण्याकरिता केंद्र शासन बी.पी.एल दराने अन्नधान्याचे (गहू व तांदूळ) अतिरिक्त नियतन

मंजूर करते. त्यानुसार या विभागाच्या दिनांक २६.४.२००२ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार सदर धान्याचे वितरण करण्यात येते.

केंद्र शासनाने दिनांक १३.०२.२०२० च्या पत्रान्वये कल्याणकारी संस्था व वसतीगृहे योजनेंतर्गत शासनाच्या मालकीच्या व शासनामार्फत चालविण्यात येत असलेल्या कल्याणकारी संस्थासह, शासन अनुदानित कल्याणकारी संस्था व वसतीगृहांमधील लाभार्थ्यांसाठी नियतन मंजूर करण्यात येणार असल्याचे कळविले आहे. त्यानुसार सद्यस्थितीत सदर योजनेंतर्गत अन्नाधान्य मिळणाऱ्या शिधापत्रिकाधारक आस्थापनांची संख्या ३८९४ असून त्यातील लाभार्थींची संख्या ३८८१४२ आहे. यामध्ये शासकीय संस्था २१४ असुन त्यामधील लाभार्थ्यी संख्या ३२३४१ व शासन अनुदानित संस्थांची संख्या ३६८० असून त्यामधील लाभार्थी संख्या ३५५८५९ आहे. संस्थांना १५ किलो प्रति निवासी अन्नधान्याचे वाटप करण्यात येते.

## २) जीवनावश्यक वस्तु अधिनियम, १९५५

जीवनावश्यक वस्तु अधिनियम, १९५५ च्या तरतुदीनुसार जीवनावश्यक वस्तुंचा पुरवठा, वाटप, साठा यावर संनियंत्रण ठेवण्यासाठी विविध सांविधिक आदेशामध्ये तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. सांविधिक आदेशातील तरतुदींचे संबधित परवानाधारकांकडून उल्लंघन झाल्यास परवाना प्राधिकारी म्हणजेच संबधित जिल्हा पुरवठा अधिकारी, अन्नधान्य वितरण अधिकारी तसेच मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्रात परिमंडळीय उपनियंत्रक, शिधावाटप हे संबंधित परवानाधारकाच्या केरोसीन परवान्याची अथवा रास्तभाव/अधिकृत शिधावाटप दुकानाच्या प्राधिकारपत्राची अनामत रक्कम अंशत:/पूर्ण सरकारजमा करण्याची कारवाई करतात अथवा रद्द/निलंबित करतात. अशा आदेशाविरुद्ध व्यथित होऊन संबंधित परवानाधारक उप आयुक्त (पुरवठा) यांच्याकडे पुनरीक्षण / अपील अर्ज दाखल करतात. परवानाधारकाने आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या कालावधीत उप आयुक्त (पुरवठा) यांचेकडे पुनरीक्षण अर्ज करणे आवश्यक आहे. प्राप्त पुनरीक्षण अर्जावर उप आयुक्त (पुरवठा) यांनी योग्य तो निर्णय घ्यावयाचा आहे. मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्रात संबंधित परवानाधारकांविरुद्ध नियंत्रक शिधावाटप, मुंबई यांना कारवाई करण्याबाबत प्राधिकृत करण्यात आलेले आहे.

उप आयुक्त (पुरवठा) तसेच नियंत्रक शिधावाटप, मुंबई यांच्या आदेशाने व्यथित झालेले परवानाधारक आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या कालावधीत मा.मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण/ मा. राज्यमंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांच्यासमोर आदेशाच्या प्रती व विहीत शुल्क असलेल्या कोर्ट फी स्टँपसह पुनरीक्षण अर्ज दाखल करुन दाद मागू शकतात. सदर अर्जावर मा.मंत्री / मा. राज्यमंत्री यांच्यामार्फत उचित निर्णय घेण्यात येतो. मा.मंत्री / मा.राज्यमंत्री यांच्या आदेशाविरुद्ध पुनर्विलोकन दाखल करावयाचे असल्यास, अपिलार्थीने आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून २ वर्षाच्या आत मा.मंत्री / मा. राज्यमंत्री यांच्यासमोर पुनर्विलोकन अर्ज सादर करणे आवश्यक असते.

अशा पद्धतीने दाखल करुन घेतलेल्या पुनरीक्षण / पुनर्विलोकन अर्जावर मा.मंत्री / मा. राज्यमंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यथावकाश सुनावणी घेऊन अंतिम निर्णय/आदेश

पारित करतात. मा.मंत्री / मा.राज्यमंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांनी पुनर्विलोकन अर्ज प्रकरणी पारीत केलेल्या आदेशाविरुद्ध परवानाधारक मा.उच्च न्यायालयात दाद मागू शकतात.

## ३) अन्नधान्य वितरणाची सुधारित पध्दत

"सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत निर्धारित दराने व योग्य दर्जाचे धान्य शिधापत्रिकाधारकांना खात्रीशिररित्या उपलब्ध होईल, याची हमी देण्याच्या उद्देशाने शासनाने सुधारित धान्य वितरण प्रणाली राबविण्याबाबत दि.१५ जानेवारी, २०२१ रोजी निर्णय घेतला आहे. सदर सुधारित धान्य वितरण प्रणालीअंतर्गत भारतीय अन्न महामंडळ गोदाम ते रास्तभाव दूकानांपर्यंत जिल्हावार एकाच वाहतूकदारामार्फत शासकिय खर्चाने अन्नधान्याची वाहतूक करण्याचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयातील तरतूदींनुसार आतापर्यंत १९ जिल्हे व मुंबई ठाणे परिमंडळ क्षेत्रातील सर्व ५ परिमंडळे अशा रितीने एकुण २४ जिल्हे/परिमंडळातील वाहतूक कंत्राटदारांची नियुक्ती करण्यात आली असून उर्वरित १५ जिल्ह्यातील निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे."

## ४) शिधापत्रिका

### अ) <u>तिहेरी शिधापत्रिका योजना :-</u>

राज्यामध्ये दिनांक ५ मे, १९९९ पासून तिहेरी कार्ड योजना लागू करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने राज्यामध्ये सर्व शिधापत्रिकाधारकांना पुढील निकषाप्रमाणे तीन रंगाच्या शिधापत्रिका वितरीत करण्यात येतात.

A) पिवळया शिधापत्रिकांसाठी निकष :-

लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या लाभार्थ्यांना (बी.पी.एल.) पिवळया रंगाच्या शिधापत्रिकेसाठी :-

i) आयआरडीपीच्या सन १९९७-९८ च्या यादीत नाव समाविष्ट असणे व कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रुपये १५,०००/- या मर्यादेत असले पाहिजे.

ii) कुटुंबातील कोणतीही व्यक्ती डॉक्टर, वकील, स्थापत्य विशारद, चार्टर्ड अकाऊन्टट नसावी.

iii) कुटुंबातील कोणतीही व्यक्ती व्यवसाय कर, विक्रीकर किंवा आयकर भरत नसावी किंवा भरण्यास पात्र नसावी.

iv) कुटुंबाकडे निवासी दूरध्वनी नसावा.

v) कुटुंबाकडे चारचाकी वाहन नसावे.

vi) कुटुंबातील सर्व व्यक्तींच्या नावे एकूण दोन हेक्टर जिरायत किंवा एक हेक्टर हंगामी बागायत किंवा अर्धा हेक्टर बारमाही बागायत (दुष्काळी तालुक्यात त्याच्या दुप्पट क्षेत्र ) जमीन नसावी.

- शासन निर्णय दिनांक ९ सप्टेंबर, २००८ अन्वये राज्यातील सर्व विडी कामगार तसेच सर्व पारधी व कोल्हाटी समाजाच्या कुटुंबांना आणि शासन निर्णय दिनांक २९ सप्टेंबर, २००८,

२१ फेब्रुवारी, २००९ व दिनांक १७ जानेवारी, २०११ अन्वये परित्यक्त्या व निराधार स्त्रियांना बी.पी.एल. शिधापत्रिकांचे लाभ तात्पुरत्या स्वरुपात देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

- शासन निर्णय दि.१७.३.२००३ अन्वये बंद पडलेल्या कापड गिरण्या, सूत गिरण्या, साखर कारखाने, इ. मधील कामगारांना पिवळया शिधापत्रिकांचे लाभ तात्पुरत्या स्वरुपात देण्याचा निर्णय घेतला आहे.

B-i) केशरी शिधापत्रिकेसाठी निकष :-

लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या लाभार्थ्यांना (ए.पी.एल.) केसरी रंगाच्या शिधापत्रिकेसाठी :-

i) कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रुपये १५,०००/- पेक्षा जास्त परंतु १ लक्ष किंवा त्यापेक्षा जास्त नसावे.

ii) कुटुंबातील कोणाही व्यक्तीकडे चारचाकी यांत्रिक वाहन नसावे. ( टॅक्सी चालक वगळून)

iii) कुटुंबातील सर्व व्यक्तींच्या नावे मिळून ४ हेक्टर किंवा त्यापेक्षा जास्त बारमाही बागायती जमीन असू नये.

B-ii ) प्राधान्य गटातील शिधापत्रिकेसाठी निकष :-

राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत लाभार्थ्यांची निवड करण्यासाठी निकष ठरवितांना लक्ष्य निर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत लाभ घेत असलेल्या (ब-१) मधील लाभार्थ्यांपैकी ज्या लाभार्थ्यांनी सन २०११ मध्ये विहित नमुन्यात वार्षिक कौटुंबिक उत्पन्न नमूद केले आहे, त्या उत्पन्नानुसार शहरी भागात कमाल रु. ५९,०००/- पर्यंत वार्षिक कौटुंबिक उत्पन्न असणाऱ्या लाभार्थ्यांचा पात्र लाभार्थी म्हणून व ग्रामीण भागात कमाल रु. ४४,०००/- पर्यंत वार्षिक कौटुंबिक उत्पन्न असणाऱ्या लाभार्थ्यांचा पात्र लाभार्थी म्हणून समावेश करणेबाबत दिनांक १७.१२.२०१३ च्या शासन निर्णयान्वये निर्णय घेण्यात आला आहे. सदर लाभार्थ्यांकडील केशरी शिधापत्रिकांवर प्रथम पृष्ठावर "वरील उजव्या कोपऱ्यात" **"प्राधान्य कुटुंबातील लाभार्थी"** असा शिक्का मारण्यात आला आहे.

C) अंत्योदय योजना लाभार्थी निकष:

केंद्र शासनाने दिनांक २५.१२.२००० रोजी अंत्योदय योजनेची घोषणा केली होती. सदर योजनेंतर्गत गरिबातील गरिब (Poorest of the poor) कुटुंबाना दरमहा ३५ किलो धान्य गहू-२ रूपये व तांदूळ-३ रूपये प्रती किलो या दराने वितरीत करण्यात येत आहे. शासन निर्णय दिनांक १७.०७.२०१३ नुसार अंत्योदय अन्न योजनेसाठी लाभार्थ्यांची निवड करण्यासाठी केंद्र शासनाने वेळोवेळी राज्य शासनास केलेल्या मार्गदर्शक सुचनांनूसार पात्र लाभार्थ्यांचे निकष खालीलप्रमाणे आहेत.

I. ज्या कुटुंबाचे प्रमुख विधवा स्त्रिया अथवा आजारी वा अपंग किंवा ६० वर्षे वयावरील वृध्द आहेत व ज्यांना उदरनिर्वाहाचे निश्चित साधन नाही अथवा सामाजिक आधार नाही.

II. एकटे राहात असलेले दुर्धर आजारग्रस्त / अपंग / विधवा / ६० वर्षावरील वृध्द, ज्यांना कौटुंबिक वा सामाजिक आधार अथवा कायम स्वरूपी उत्पन्नांचे साधन उपलब्ध नाही.

III. आदिम आदिवासी कुटुंबे (माडीया, कोलाम, कातकरी ).

IV. भूमिहीन शेतमजूर, अल्पभूधारक शेतकरी, ग्रामीण कारागीर उदा. कुंभार, चांभार, मोची, विणकर, सूतार, लोहार तसेच झोपडपट्टीतील रहिवासी विशिष्ट क्षेत्रात रोजंदारीवर काम करून उपजिविका करणारे नागरीक जसे हमाल, मालवाहक, सायकलरिक्षा चालविणारे, हातगाडीवरून मालाची ने-आण करणारे, फळ व फुले विक्रेते, गारूडी, कचऱ्यातील वस्तु गोळा करणारे तसेच निराधार व अशा प्रकारे काम करणारे शहरी तसेच ग्रामीण भागातील व्यक्तींची कुटुंबे.

V. कुष्ठरोगी / बरा झालेला कुष्ठरोगी कुटूंब प्रमुख असलेली कुटुंबे.

D) शुभ्र शिधापत्रिकांसाठी निकष :-

ज्या कुटुंबातील सर्व व्यक्तींचे मिळून एकत्रित वार्षि क उत्पन्न रुपये १ लक्ष किंवा त्यापेक्षा जास्त असेल किंवा त्या कुटुंबातील कोणाही व्यक्ती कडे चारचाकी यांत्रिक वाहन असेल किंवा कुटुंबातील सर्व व्यक्तीच्या नावे मिळून चार हेक्टरपेक्षा जास्त बारमाही बागायती शेतजमीन असेल अशा कुटुंबांना शुभ्र शिधापत्रिका देण्यात येतात.

ब) शिधापत्रिकेकरीता आकारण्यात येणारे दर

शिधावस्तू प्राप्त करून घेण्यासाठी प्रत्येक कुटुंबाकडे शिधापत्रिका असणे आवश्यक आहे. शिधापत्रिका मिळण्यासाठी शिधावाटप कार्यालय किंवा तहसिल कार्यालयात विहित नमुन्यातील अर्ज अर्जदाराने स्वत: केला पाहिजे.

| अ.क्र. | शिधापत्रिकेचा प्रकार | दर (रूपये) |
|---|---|---|
| १ | नविन पिवळी शिधापत्रिका | १० |
| २ | नविन केशरी शिधापत्रिका | २० |
| ३ | नविन शुभ्र शिधापत्रिका | ५० |
| ४ | दुय्यम पिवळी शिधापत्रिका | २० |
| ५ | दुय्यम केशरी शिधापत्रिका | ४० |
| ६ | दुय्यम शुभ्र शिधापत्रिका | १०० |
| ७ | शिधावाटप/ पुरवठा कार्यालयातून दिले जाणारे विविध अर्जाचे नमुने (नमुना नंबर १ सह अर्जाचे सर्व नमुने) | २ |

शिधापत्रिका ही शासनाची मालमत्ता असल्यामुळे पुरवठा निरिक्षक किंवा इतर संबंधित अधिकारी मागणी करतील तेव्हा शिधापत्रिकाधारकाने त्यांना शिधापत्रिका दाखविली पाहिजे. कोणत्याही व्यक्तीने एकापेक्षा अधिक शिधापत्रिका मिळविणे किंवा एकापेक्षा अधिक शिधापत्रिकेत नाव समाविष्ट करणे हा गुन्हा आहे.

क) अपात्र शिधापत्रिका शोध मोहिम :-

सार्वजनिक वितरण व्यवस्था (नियंत्रण) आदेश, २०१५ मधील तरतुदीनुसार शिधापत्रिका तपासणी ही निरंतर प्रक्रिया आहे.

निकषात न बसणाऱ्या शिधापत्रिका तात्काळ अपात्र ठरवून त्या रद्द करण्यात येतात व संबधितांच्या मागणीनुसार त्यांना अन्य अनुज्ञेय शिधापत्रिका देण्याची कार्यवाही करावी करण्यात येते. त्याचप्रमाणे दुबार, अस्तित्वात नसलेल्या व्यक्ती, मयत व्यक्ती व अपात्र शिधापत्रिकांसाठी शोध मोहिम राबविण्यात येते.

ड) काम पूर्ण करण्यासाठी कालमर्यादा व तक्रार कोणाकडे करावी

शिधावाटप दुकान/शिधापत्रिका/शिधावस्तू याबाबतच्या सेवा महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत विहीत कालमर्यादा तसेच पदनिर्देशित अधिकारी/ प्रथम अपिल अधिकारी व द्वितीय अपिल प्राधिकारी खालीलप्रमाणे अधिसूचित करण्यात आलेल्या आहेत.

| अ. क्र. | लोकसेवेचा तपशील | लोकसेवा पुरविण्यासाठी विहीत केलेली कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिल अधिकारी | द्वितीय अपिल प्राधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | नवीन शिधापत्रिका मागणी | ३० दिवस | शिधावाटप अधिकारी / परिमंडळ अधिकारी / तहसिलदार/ अन्नधान्य वितरण अधिकारी | सहाय्यक नियंत्रक शिधावाटप / अन्नधान्य वितरण अधिकारी / जिल्हा पुरवठा अधिकारी | उपनियंत्रक शिधावाटप / उप आयुक्त (पुरवठा) |
| २ | १.शिधापत्रिकेतील नावात दुरुती | ०३ दिवस | शिधावाटप अधिकारी / परिमंडळ अधिकारी / तहसिलदार/ अन्नधान्य वितरण अधिकारी | सहाय्यक नियंत्रक शिधावाटप / अन्नधान्य वितरण अधिकारी/ जिल्हा पुरवठा अधिकारी | उपनियंत्रक शिधावाटप / उप आयुक्त (पुरवठा) |
| | २.शिधापत्रिकेत नावे समाविष्ट करणे / नाव वाढविणे | गृहभेट आवश्यक असल्यास ३० दिवस अन्यथा ०३ दिवस | | | |
| | ३.शिधापत्रिकेमधील नाव कमी करणे | ०३ दिवस | | | |
| | ४.शिधापत्रिकेवरील पत्ता बदल करणे | ३० दिवस | | | |
| ३ | १.दुय्यम शिधापत्रिका (खराब / फाटलेली इ.) | गृहभेट आवश्यक असल्यास ३० दिवस अन्यथा ०६ दिवस | शिधावाटप अधिकारी / परिमंडळ अधिकारी / तहसिलदार / अन्नधान्य वितरण अधिकारी | सहाय्यक नियंत्रक शिधावाटप / अन्नधान्य वितरण अधिकारी / जिल्हा पुरवठा अधिकारी | उपनियंत्रक शिधावाटप / उप आयुक्त (पुरवठा) |
| | २. दुय्यम शिधापत्रिका (गहाळ शिधापत्रिका) | ३० दिवस | | | |

## ५) रास्तभाव/शिधावाटप दुकाने

### अ) राज्यातील रास्तभाव/ शिधावाटप दुकान व केरोसीन परवाने मंजूर करण्याबाबतचा निर्णय:-

राज्यात राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ लागू असून, या अधिनियमातील कलम, १२ (१) (e) मधील तरतुदी खालीलप्रमाणे आहे :-

"पंचायती, स्वयंसहायता गट, सहकारी संस्था, यासारख्या सार्वजनिक संस्थांना किंवा सार्वजनिक न्यासांना रास्तभाव दुकानांचे व्यवस्थापन करणे."

त्यानुसार सध्याची रास्तभाव दुकाने/किरकोळ केरोसिन परवाने तसेच ठेवून आजमितीस रद्द असलेली व यापुढे रद्द होणारी, राजीनामा दिलेली व लोकसंख्या वाढीमुळे द्यावयाची नवीन तसेच, विविध कारणांमुळे भविष्यात द्यावयाची नवीन रास्तभाव दुकाने व किरकोळ केरोसिन परवाने खालील प्राथम्यक्रमानुसार मंजूर करण्यात येतात :-

१. पंचायत, (ग्रामपंचायत व तत्सम स्थानिक स्वराज्य संस्था
२. नोंदणीकृत स्वयंसहायता बचत गट
३. नोंदणीकृत सहकारी संस्था
४. नोंदणीकृत सहकारी संस्था.
५. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम किंवा संस्था नोंदणी अधिनियम या कायद्याच्या अंतर्गत नोंदणी झालेल्या संस्था.
६. महिला स्वयंसहायता बचत गट व महिलांच्या सहकारी संस्था

तसेच संपूर्ण राज्यात नवीन रास्तभाव दुकान मंजुरीचा आराखडा अंतिम होईपर्यंत राज्यातील शहरी भागात नवीन रास्तभाव दुकान मंजुरीवरील शासन पत्र दि. १३.१२.२०१८ अन्वये स्थगिती देण्यात आली आहे.

परंतु सदरचा आराखडा अंतिम होण्याकरीता काही कालावधी लागणार आहे. त्यामुळे वरील दि.१३.१२.२०१८ च्या पत्रान्वये देण्यात आलेली स्थगिती शासनाच्या दि.१६.०९.२०२१ रोजीच्या पत्रान्वये उठविण्यात शासन आली असून सन २०२१-२२ या वर्षा करिता सप्टेंबर, २०२१ व ऑक्टोबर, २०२१ पर्यंत शहरी भागात नवीन रास्तभाव दुकान मंजूर करण्याकरीता जाहिरनामा काढण्याची मुभा देण्यात आली होती.

### आ) रास्तभाव दुकाने व किरकोळ केरोसिन परवाने मंजूर करण्याबाबत करावयाची कार्यवाही.

i. जाहीरनामा प्रसिध्द करणे:-

अ) ज्या गावात/क्षेत्रात, नवीन रास्तभाव दुकाने व किरकोळ केरोसिन परवाना मंजूर करावयाचा असेल तेथे एकाच वेळी एकत्रित जाहीरनामा प्रसिध्द करण्यात यावा.

आ) ज्या गावात/क्षेत्रात, रास्तभाव दुकान अस्तित्वात असेल व आता फक्त किरकोळ केरोसिन परवाना मंजूर करावयाचा असेल तेथे फक्त किरकोळ केरोसिन परवाना मंजूर करण्यासाठी जाहीरनामा प्रसिध्द करण्यात यावा.

इ) ज्या गावात/क्षेत्रात, रास्तभाव दुकान अस्तित्वात असेल व आता फक्त रास्तभाव दुकान मंजूर करावयाचे असेल तेथे फक्त रास्तभाव दुकान मंजूर करण्यासाठी जाहीरनामा प्रसिध्द करण्यात यावा.

ii. **गटांकडून अर्ज मागविणे व गटाची निवड करणे.**

प्रसिध्द केलेल्या जाहीरनाम्यास प्रतिसाद म्हणून संबंधित गावातील/ क्षेत्रातील गटांना अर्ज करता येईल. अशा गटांकडून आलेल्या अर्जांमधून गटांची निवड प्राथम्यक्रमानुसार खालीलप्रमाणे करण्यात येते :-

अ) प्राथम्यसूचीनुसार गटांची निवड करतांना, ज्येष्ठ, वर्धनक्षम व नियमित कार्यरत असलेल्या अंतर्गत व्यवहार पारदर्शक व परतफेड चोख व नियमित असलेल्या व प्रतिवर्षी लेखापरिक्षण केलेल्या गटास प्राधान्य देण्यात यावे. निवड करावयाच्या गटाचे हिशेब व लेखे अद्ययावत असावेत व परतफेडीचे प्रमाण किमान ८०% असावे.

आ) गटांची निवड करण्याचे काम सध्याचे रास्तभाव दुकाने व किरकोळ केरोसिन मंजूर करणारे परवाना प्राधिकारी यांच्या अध्यक्षतेखालीली समिती करेल. (सध्या मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रात नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई तसेच पुणे नागपूर व सोलापूर शहरात संबंधित अन्नधान्य वितरण अधिकारी आणि उर्वरित अन्य क्षेत्रात संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी हे परवाना मंजूर करणारे प्राधिकारी आहेत.)

इ) या समितीमध्ये संबंधित जिल्हा समन्वयक, महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम), प्रकल्प संचालक ग्रामीण विकास यंत्रणा किंवा त्यांचा किमान गट, ब दर्जाचा प्रतिनिधी व संबंधित तहसील दार हे सदस्य असतील. आदिवासी प्रकल्प क्षेत्रातील तालुक्यांमध्ये, प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास, महानगरपालिका क्षेत्रात संबंधित प्रभाग अधिकारी व नगरपालिका क्षेत्रात मुख्याधिकारी, नगरपालिका यांना या समितीवर सहसदस्य म्हणून घेण्यात यावे

ई) समितीच्या निर्णयानुसार, ग्रामीण क्षेत्रात संबंधित गटास रास्तभाव दुकानाचे प्राधिकारपत्र किंवा किरकोळ केरोसिन परवाना देण्यापूर्वी परवाना प्राधिकारी , सदर प्रस्ताव महिला ग्रामसभेकडे विचारार्थ व शिफारशीसाठी पाठविला व महिला ग्रामसभेची शिफारस विचारात घेऊन दुकान मंजूरीबाबत अंतिम निर्णय घेईल.

उ) जाहीरनामा प्रसिध्द करुनही रास्तभाव दुकान व किरकोळ केरोसिन परवाने मंजूर करण्यासाठी, पात्र गट उपलब्ध होणार नाहीत, अशा ठिकाणी पुन्हा जाहीरनामा काढून प्राथम्यसूचीनुसार रास्तभाव दुकाने/ किरकोळ केरोसिन परवाने मंजूर करण्यात यावेत.

**(इ) दुकानदारांच्या मृत्युनंतर त्यांच्या वारसास रास्तभाव/शिधावाटप दुकानाचा परवाना मंजूर करणे**

a) दुकानदाराच्या मृत्युनंतर त्याच्या नावावरील दुकान त्वरीत रद्द करण्यात यावे.
b) त्याच्या वारसास रास्तभाव दुकान तात्पुरत्या स्वरुपात चालविण्यास त्वरीत परवानगी द्यावी.
c) मृत दुकानदाराच्या वारसास खालील अटींच्या अधिनतेने दुकानाचा परवाना नव्याने द्यावा:-
   i. मृत दुकानदाराच्या कालावधीत दुकानाच्या कामकाजाबाबत गंभीर तक्रारी आलेल्या नसाव्यात.

ii. ज्या वारसाच्या नावे परवाना द्यावयाचा आहे त्या वारसाला इतर वारसांची स्पष्ट व लेखी संमती असली पाहिजे. वारसांमध्ये कोणतेही मतभेद असल्यास कोणत्याही वारसाच्या नावे परवाना देऊ नये.

iii. ज्या वारसाच्या नावे परवाना द्यावयाचा आहे तो दुकान चालविण्यास सक्षम असावा, नेहमीच्या अटीप्रमाणे त्याच्याकडे पुरेशी जागा, भांडवल इत्यादी बाबी असाव्यात.

iv. वारसाने शिधावाटप/रास्तभाव दुकान स्वत: चालविले पाहिजे.

v. संबंधित वारसाचा चरितार्थ संबंधित रास्तभाव दुकानावर पूर्णत: अवलंबून असला पाहिजे.

vi. वारसामध्ये पती किंवा यथास्थिती पत्नी तसेच सज्ञान मुलगा, सज्ञान अविवाहीत मुलगी, अवलंबित आई किंवा वडील किंवा सून यांचाच फक्त समावेश राहील. (तसेच, अशा सुनेने पुर्नविवाह केल्यास परवाना रद्द होईल. त्याचप्रमाणे, पत्नीच्या नावे असलेला परवाना तिच्या मृत्यूनंतर पतीच्या नावे केल्यानंतर, अशा पतीने पुर्नविवाह केल्यास असा परवाना रद्द होईल. तसेच, पतीच्या नावे असलेला परवाना त्याच्या मृत्यूनंतर पत्नीच्या नावे केल्यानंतर, अशा पत्नीने पुर्नविवाह केल्यास परवाना रद्द होईल.)

vii. वारसाच्या नावे परवाना देण्यासाठी जाहीरनामा काढण्याची गरज नाही.

viii. ज्या ठिकाणी वारसास कोणत्याही कारणाने परवाना देता आला नाही तर, नेहमीच्या पध्दतीने जाहीरनामा काढून दुकान मंजूरीची कार्यवाही करण्यात यावी.

परवानाधारकाच्या मृत्यूनंतर ३ महिन्याच्या आत वारसाने नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा / उप नियंत्रक मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्र/संबंधित जिल्हाधिकारी/जिल्हा पुरवठा अधिकारी / अन्नधान्य वितरण अधिकारी यांना अर्ज करणे आवश्यक होते.

परंतु शासनाच्या दि.३०.०८.२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये ३ महिन्याची अट रद्द करुन ही अट १ वर्षापर्यन्त करण्यात आली आहे. तसेच, १ वर्षाच्या पुढील प्रकरणे शासन स्तरावर सादर करण्याच्या सूचना या शासन निर्णयान्वये देण्यात आल्या आहेत.

परवानाधारकाच्या मृत्यूनंतर संबंधित रास्तभाव दुकानाचा परवाना वारसाच्या नावे वर्ग करेपर्यंत सदर रास्तभाव दुकानाच्या क्षेत्रातील शिधापत्रिका नजीकच्या रास्तभाव दुकानास तात्पुरत्या स्वरुपात जोडण्यात याव्यात. कोणत्याही कारणाने वारसास परवाना देता आला नाही, तर त्यानंतर मात्र नेहमीच्या पध्दतीने जाहिरनामा काढून प्राथम्य सुचीनुसार दुकान मंजूरीची कार्यवाही करण्यात यावी.

**(ई) शिधावाटप दुकान मंजूरीसाठी कालमर्यादा व परवाना प्राधिकारी आणि दाद मागण्याची यंत्रणा:-**

सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वितरण करण्यात येणाऱ्या शिधावस्तू कार्डधारकांना सहजपणे उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने नवीन शिधावाटप दुकान मंजूर करणे या सेवा महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम,२०१५ अंतर्गत विहीत कालमर्यादा तसेच पदनिर्देशित अधिकारी/ प्रथम अपिल अधिकारी व द्वितीय अपिल प्राधिकारी खालीलप्रमाणे अधिसूचित करण्यात आलेल्या आहेत :-

| अ. क्र. | लोकसेवेचा तपशील | लोकसेवा पुरविण्यासाठी विहीत केलेली कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिल अधिकारी | द्वितीय अपिल प्राधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | नवीन रास्तभाव दुकानाची मंजुरी | जाहिरनामा काढल्यानंतर १८० दिवस | नियंत्रक शिधावाटप / अन्नधान्य वितरण अधिकारी / जिल्हा पुरवठा अधिकारी | विभागीय आयुक्त / जिल्हाधिकारी | सचिव / विभागीय आयुक्त |
| २ | रास्तभाव दुकानाच्या परवान्याचे नुतनीकरण | ६० दिवस | उपनियंत्रक शिधावाटप / अन्नधान्य वितरण अधिकारी / जिल्हा पुरवठा अधिकारी | नियंत्रक शिधावाटप / जिल्हाधिकारी | विभागीय आयुक्त |

(उ) रास्तभाव दुकानांच्या तपासण्या

सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत शिधावस्तुचे वितरण शिधापत्रिकाधारकांना व्यवस्थीत होण्याचे दृष्टीने रास्तभाव दुकानदारांच्या कारभारावर देखरेख ठेवण्याकरिता त्यांनी गैरव्यवहार करु नये यासाठी रास्तभाव दुकानांच्या नियमितपणे तपासण्या करण्यात येतात. याशिवाय अचानक तपासण्याही करण्यात येतात. या तपासण्या नियमितपणे व परिणामकारकरित्या करण्यासाठी अपर जिल्हाधिकारी, जिल्हा पूरवठा अधिकारी, उप विभागीय अधिकारी, तहसीलदार तसेच इतर कर्मचाऱ्यांनी करावयाच्या तपासण्याबाबतची मानके दि. १७ एप्रिल २००१ च्या परिपत्रकान्वये सुधारीत करण्यात आली आहेत. तसेच, तहसील दार, नायब तहसील दार, पुरवठा निरीक्षण अधिकारी व पुरवठा निरीक्षक यांना दरमहा नेमून दिलेल्या स्वतंत्र नियमित तपासण्यांपैकी निम्म्या म्हणजेच नियमित तपासण्या त्यांनी नजीकच्या तालुक्यातील रास्तभाव दुकानांच्या कराव्यात, अशा सूचना दि.२७ एप्रिल, २००२ च्या शासन परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत.

(ऊ) नवीन रास्तभाव/शिधावाटप दुकान देण्याचे निकष

नवीन रास्तभाव/शिधावाटप दुकान मंजूर करताना, कोणत्याही शिधापत्रिकाधारकाला शिधावस्तू मिळण्यासाठी ५ किलोमीटरपेक्षा जास्त दूर जावे लागू नये हे शिधावाटप दुकानाची आवश्यकता ठरविण्यासंबंधातील शासनाचे धोरण आहे. शिधावाटप दुकानांना किती युनिट्स जोडावेत याचे निकष पुढीलप्रमाणे :-

अ) मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्र:-

a) व्यक्तिकडून चालविले जाणारे शिधावाटप दुकान किमान ३००० व कमाल ८००० युनिट्स.
b) सहकारी संस्थेकडून चालविले जाणारे शिधावाटप दुकान किमान ३,००० व कमाल १०,००० युनिट्स.

ब) इतर नागरी क्षेत्रे :-

a) व्यक्तिकडून चालविले जाणारे शिधावाटप दुकान किमान २००० व कमाल ६००० युनिट्स.

b) सहकारी संस्थेकडून चालविले जाणारे शिधावाटप दुकान किमान २००० व कमाल ८००० युनिट्स.

क) ग्रामीण क्षेत्रे :-

a) व्यक्तीकडून किंवा सहकारी संस्थेकडून चालविले जाणारे रास्तभाव दुकान किमान १००० व कमाल ४००० युनिट्स किंवा २००० लोकसंख्या

ड) दुर्गम आदिवासी क्षेत्रे :-

दुर्गम आदिवासी क्षेत्रामध्ये पावसाळयात संपर्क तुटणाऱ्या गावांमध्ये २००० लोकसंख्येची अट शिथिल करुन आवश्यकता असल्यास ५०० लोकसंख्येचा स्वतंत्र महसुली गावात सुध्दा रास्तभाव दुकान उघडण्याचा जिल्हाधिकारी निर्णय घेऊ शकतात.

शिधावाटप दुकान मंजूर करण्यासाठी स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात येते. जिल्हयाच्या ठिकाणी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत तर मुंबई, ठाणे शिधावाटप क्षेत्रात नियंत्रकांमार्फत अर्ज मागविण्यात येतात. ५,००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या गावासाठी दुकान मंजूर, करावयाचे असल्यास वर्तमानपत्रातून जाहिरात प्रसिध्द करण्यात येत नाही. त्याऐवजी ग्रामपंचायतीच्या नोटीस फलकावर नोटीस लिहून किंवा दवंडी देऊन प्रसिध्दी देण्यात येते.

शासन निर्णय दि.२.२.२०२२ नुसार ज्या ठिकाणी रद्द झालेल्या शिधावाटप / रास्त भाव दुकान परवान्यांविरुद्धचे अपील - मा. न्यायालय, मा. मंत्री (अ.ना.पु.व.ग्रा.सं) / मा. राज्यमंत्री (अ.ना.पु.व.ग्रा.सं.) / नियंत्रक शिधावाटप संचालक, नागरी पुरवठा, मुंबई / उप आयुक्त (पुरवठा) यांच्याकडे व सुनावणी उपनियंत्रक शिधावाटप/जिल्हा पुरवठा अधिकारी/अन्नधान्य वितरण अधिकारी यांच्याकडे निर्णयासाठी प्रलंबित असतील तर अशा अपिलावर/

सुनावणीवर अंतिम निर्णय होईपर्यंत त्या ठिकाणी नविन रास्त भाव दुकान मंजुरीसाठी जाहीरनामा प्रसिध्द करण्यात येऊ नये. तसेच नविन रास्तभाव दुकाने मंजूर करण्यासाठीचा वर्षभराचा सुधारित सहामाही कालबद्ध कार्यक्रम निश्चित करण्यात आला असून त्या कालबद्ध कार्यक्रमानुसारच नविन शिधावाटप/रास्त भाव दुकाने परवाने मंजूर करण्यात यावीत.

महाराष्ट्र शासन व CSC e-Governance Service India Ltd. यांच्यातील करार, दि.२१.०३.२०२२:

अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन व CSC e-Governance Service India Ltd. कंपनी यांचे संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र रास्त भाव दुकानदार यांच्या सबलीकरणासाठी समझोता करारनाम्यावर (MOU) वर दि.२१ मार्च, २०२२ रोजी स्वाक्षरी झाली. भारत सरकारने सुरु केलेल्या डिजीट्ल इंडिया

या मोहिमेचा उद्देश शासकीय सेवा ही प्रत्येक नागरिकांना इलेक्ट्रोनिकरित्या उपलब्ध करुन देणे हा आहे. CSC केंद्राच्या माध्यमातून राज्यातील रास्त भाव दुकानदार आता दुकानातून खालील सेवा देऊ शकतात.

- बँकाचे सर्व व्यवहार
- रेल्वे, विमान तिकिट बुकींग
- सर्व प्रकारचे बिल्स, उदा. वीजबील, फोन बील, पाणी बील इ.
- आरोग्य सेवा
- शेतीविषयक सेवा
- नविन / दुबार शिधापत्रिका/ नाव समाविष्ट करणे/ नाव कमी करणे.

## ६) पेट्रोल पंप व गॅस एजन्सी

पेट्रोल पंप व एल.पी.गॅस वितरकांची नेमणूक केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार तेल कंपन्या करू शकतात. सर्वाधिक खपाच्या एका मराठी व एका इंग्रजी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तेल कंपन्या अर्ज मागवितात. त्यानंतर पात्र उमेदवारांचे डिलर निवड मंडळामार्फत मुलाखती घेऊन, डिलर शिफारशीनुसार पेट्रोल, डिझेल पंप व गॅस वितरकांची नेमणूक करण्यात येते.

गॅस, पेट्रोल व डिझेल वितरणाबाबत तक्रार अथवा सूचना करावयाच्या असल्यास तेल कंपन्यांचे कार्यालय, राज्यस्तरीय समन्वयक, तेल उद्योग, महाराष्ट्र राज्य, फर्नेस ऑईल विल्डिंग, १० पी-डिमेला रोड, वाडीबंदर, मुंबई ४०० ०१० यांच्याकडे तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाकडे व अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडे कराव्यात.

## ७) केरोसिन परवाना मंजूर करण्याची कार्यपद्धती

- सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत राज्यास प्राप्त होणारे अनुदानित दराचे केरोसिन लाभार्थ्यांना वितरीत करण्यासाठी महाराष्ट्र केरोसिन डिलर्स लायसेन्सींग ऑर्डर, १९६६ नुसार घाऊक व हॉकर्स केरोसिन परवानाधारकांची तसेच महाराष्ट्र किरकोळ व्यापार परवाना आदेश, १९७९ नुसार किरकोळ केरोसिन परवानाधारकांची नियुक्ती करण्यात येते.
- केरोसिन परवान्यांकरीता निश्चित करण्यात आलेले अनामत रक्कम व इतर अनुषंगिक शुल्क पुढीलप्रमाणे आहेत. (शासन निर्णय दि. २६.०८.२०२१ नुसार)

| अनुज्ञप्ती चा प्रकार | परवाना मंजूरी/ नुतनीकरण आवेदन शुल्क. | अनामत रक्कम | परवाना शुल्क | नुतनीकरण शुल्क | विलंब शुल्क | दुय्यम परवाना शुल्क |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| किरकोळ | रू.१००/- | रू.५०००/- | रू.१०००/- | रू.५००/- | रू.५०/-प्रतिदिन | रू.५००/- |
| हॉकर्स | रू.१००/- | रू.४०००/- | रू.५००/- | रू.५००/- | रू.५०/- प्रतिदिन | रू.५००/- |
| अर्धघाऊक | रू.५००/- (केवळ नुतनीकरण) | रू.१२०००/- | रू.१५००/- | रू.१०००/- | रू.३००/- प्रतिदिन | रू.१०००/- |
| घाऊक | रू.५००/- | रू.२००००/- | रू.२०००/- | रू.१५००/- | रू.५००/- प्रतिदिन | रू.१५००/- |

सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वितरण करण्यात येणाऱ्या किरकोळ रॉकेल विक्री परवाने व परवान्याचे नुतनीकरण या सेवा महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम,२०१५ अंतर्गत विहीत कालमर्यादा तसेच पदनिर्देशित अधिकारी/ प्रथम अपिल अधिकारी व द्वितीय अपिल प्राधिकारी खालीलप्रमाणे अधिसूचित करण्यात आलेल्या आहेत :-

| अ. क्र. | लोकसेवेचा तपशील | लोकसेवा पुरविण्यासाठी विहीत केलेली कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिल अधिकारी | द्वितीय अपिल प्राधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | किरकोळ रॉकेल विक्री परवाने | ९० दिवस | अन्नधान्य वितरण अधिकारी / जिल्हा पुरवठा अधिकारी | जिल्हाधिकारी | विभागीय आयुक्त |
| २ | किरकोळ रॉकेल विक्री परवान्याचे नुतनीकरण | ६० दिवस | अन्नधान्य वितरण अधिकारी / जिल्हा पुरवठा अधिकारी | जिल्हाधिकारी | विभागीय आयुक्त |

- **सार्वजनिक वितरण व्यवस्थेंअतर्गत केरोसिनचे वितरण PoS (Point of Sale Device) व्दारे करणे.**

सार्वजनिक वितरण व्यवस्थेंअतर्गत प्राप्त होणारे केरोसिन केवळ बिगरगॅसजोडणी शिधापत्रिकाधारकांनाच अनुज्ञेय आहे. याअनुषंगाने राज्यात गॅस स्टॅपिंग मोहिम राबवून गॅसजोडणी शिधापत्रिकाधारकांना केरोसिनमधून वगळण्यात येत आहे. तथापि, यासंदर्भातील अचूक माहिती शासनास प्राप्त होत नसल्याने प्रायोगिक तत्वावर मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रात केरोसिनचे वितरण दि.०१.०६.२०१८ पासून PoS मधून करण्यात आले. त्यामुळे माहे जून, २०१८ पासून मुंबई-ठाणे शिधावाटपक्षेत्राच्या केरोसिन नियतनात ३० टक्के बचत होऊन, केवळ पात्र लाभार्थ्यांना अनुदानित

दराचे केरोसिन पुरविणे शक्य झाले. सबब, राज्यातील इतर जिल्हयांमध्येही अनुदानित दराचे केरोसिन केवळ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहचविणे शक्य व्हावे व कोणताही पात्र लाभार्थी अनुदानित दराच्या केरोसिनपासून वंचित राहू नये, यास्तव शासन निर्णय दि. ०१.०८.२०१८ नुसार सार्वजनिक वितरण व्यवस्थेंअतर्गत वितरीत करावयाचे केरोसिन PoS (Point of Sale Device) व्दारे वितरीत करण्यात येत आहे.

## ८) लक्ष्यनिर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संपूर्ण संगणकीकरण

राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम या योजनेतील अपात्र लाभार्थ्यांचा शोध घेऊन धान्याचा होणारा अपहार/गैरव्यवहार थांबविण्यासाठी तसेच लाभार्थ्यांना पारदर्शी पध्दतीने धान्याचे वाटप करण्यासाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संपूर्ण संगणकीकरण प्रकल्प राबविण्यात येत आहे. या प्रकल्पातंर्गत लाभार्थ्यांची ई-पॉसद्वारे बायोमेट्रिक ओळख पटवून शिधावस्तूचे वितरण करण्यात येत आहे.

माहे मे २०१८ मध्ये AePDS प्रणाली संपूर्ण राज्यात यशस्वीपणे सुरू करण्यात आली. तसेच, या नवीन प्रणालीमुळे १०० टक्के धान्याचे वितरण आधार व्हेरिफाईड करून होत आहे. या अभिनव प्रणालीमुळे अन्नधान्यासाठी सरकारवर अवलंबून असलेल्या समाजातील कमकुवत वर्गास धान्याची उपलब्धता व त्याचा विनासायास लाभ घेणे शक्य झाले आहे. राज्यातील सर्व रास्तभाव दुकानांमध्ये बसविण्यात आलेल्या ई-पॉस मशीनद्वारे करण्यात येणाऱ्या धान्य वितरणाचा तपशील http://mahaepos.gov.in या संकेतस्थळावर जनतेसाठी उपलब्ध आहे.

### सार्वजनिक वितरण व्यवस्थेची हेल्पलाईन

सार्वजनिक वितरण व्यवस्थेतंर्गत उद्भवणाऱ्या तक्रारीचे निराकरण करण्यासाठी हेल्पलाईन दि.१.५.२०१२ पासून संपूर्ण राज्यात कार्यान्वित करण्यात आली आहे. या हेल्पलाईनचा टोल फ्री क्रमांक १८००-२२-४९५० व १९६७ हा आहे.

### एस.एम.एस.गेटवे

शिधावाटप दुकान क्षेत्रातील पात्र लाभार्थ्यांना उपलब्ध करुन दिलेल्या धान्याची माहिती व्हावी म्हणून दि.१.७.२०१२ पासून एस.एम.एस.गेटवे कार्यान्वित करण्यात आलेली असून विभागाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन ग्रुप एसएमएस पाठविण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

### "एक देश एक रेशनकार्ड" योजना

One Nation One Ration Card ही योजना १ जानेवारी, २०२० पासून राज्यात लागू करण्यात आली आहे. केंद्र शासनाच्या या योजनेतंर्गत संबंधित रास्तभाव दुकानात आधार Authentication करुन लाभार्थ्याला पोर्टेबिलिटीद्वारे कोणत्याही राज्यातील कोणत्याही रास्तभाव दुकानातून धान्य उचलण्याची सोय उपलब्ध आहे. राज्यातील रास्तभाव दुकानांतून स्थलांतरित कामगार, ऊसतोड मजूर, आदिवासी इ. स्थलांतरण करणाऱ्या लाभार्थ्यांना त्यांच्या स्थलांतरणाच्या ठिकाणी कोणत्याही रास्तभाव दुकानांत त्यांना अनुज्ञेय असलेले धान्य प्राप्त करुन घेण्याची सुविधा पोर्टेबिलिटीद्वारे ई-पॉस उपकरणांवर उपलब्ध करुन देण्यात आली आहे. याकरिता लाभार्थ्यांना सद्यस्थितीत असलेल्या

शिधापत्रिकांवरील १२ अंकी क्रमांकाचा वापर करुन आधार प्रमाणिकरणाद्वारे धान्य वितरीत करण्यात येते. One Nation One Ration Card या योजनेच्या माहितीकरिता हेल्पलाईन क्र .१४४४५ कार्यान्वित करण्यात आलेली आहे.

९) शिवभोजन योजना:-

- राज्य सरकारने दि. ०१ जानेवारी, २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील गरीब व गरजू जनतेला स्वस्त दरात भोजन उपलब्ध करून देण्यासाठी "शिवभोजन योजना" दि. २६ जानेवारी, २०२० पासून सुरु करण्यात आली आहे.
- शिवभोजन योजनेअंतर्गत सुरु करण्यात येणाऱ्या भोजनालयात ₹ १० /- प्रती थाळी याप्रमाणे भोजन उपलब्ध करून देण्यात येते. या योजनेंतर्गत देण्यात येणा-या थाळीमध्ये २ चपात्या, १ वाटी भाजी, १ वाटी वरण व १ मूद भात रुपये १०/- एवढया किंमतीत उपलब्ध करून देण्यात येते.
- शिवभोजन थाळीची किंमत शहरी भागामध्ये प्रतिथाळी ₹५०/- व ग्रामीण भागामध्ये ₹३५/- एवढी आहे. प्रति ग्राहकांकडून प्राप्त झालेल्या ₹१०/- एवढ्या रकमेव्यतिरिक्त उर्वरित रक्कम अनुदान म्हणून शासनाकडून देण्यात येते.
- शिवभोजन योजना कार्यान्वित करण्यासाठी "शिवभोजन ॲप्लिकेशन" तयार करण्यात आले आहे. त्याचा वापर करुनच शिवभोजन थाळी वितरीत करणे बंधनकारक आहे. शिवभोजन थाळ्या वितरीत करण्यापूर्वी लाभार्थ्याचे नाव व फोटो घेणे बंधनकारक आहे आणि फोन नंबर वैकल्पिक आहे. या ॲपवर शिवभोजन केंद्र चालकास रोजचा मेन्यू प्रसिद्ध करता येतो.
- दि. ०१.०१.२०२० च्या शासन निर्णयान्वये प्रत्येक जिल्ह्यास शिवभोजन थाळीचा ठराविक इष्टांक देण्यात आला होता. सुरुवातीला संपूर्ण राज्याचा इष्टांक १८,००० प्रतीदिन एवढा होता. तद्नंतर दि. १८.०२.२०२० च्या शासन निर्णयान्वये सदर इष्टांक दि. ०१.०१.२०२० च्या शासन निर्णयातील इष्टांकाच्या दुप्पट करण्यात आला. त्यानंतर, दि. २८.०३.२०२० च्या शासन परिपत्रकान्वये हा इष्टांक दि. ०१.०१.२०२० च्या शासन निर्णयातील इष्टांकाच्या ५ पट करून योजनेचा विस्तार तालुका स्तरावर करण्यात आला आहे. तद्नंतर शासन पत्र दि.५.०२.२०२१ अन्वये १८,८०० एवढया इष्टांकास मंजूरी देण्यात आली आहे.
- कोरोनाच्या काळात एकूण ७३४ नवीन शिवभोजन केंद्रांना मंजुरी देण्यात आली आहे आणि ३८ कार्यरत शिवभोजन केंद्रातील थाळयांची संख्या वाढवण्यात आली आहे.
- कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे मजूर, स्थलांतरीत, बेघर तसेच बाहेरगावचे विद्यार्थी इ. च्या जेवणाअभावी हाल-अपेष्टा होत असल्याने दि. २९.०३.२०२० च्या परिपत्रकान्वये शिवभोजन थाळीची किंमत दि. १४.०४.२०२१ पर्यंत रु.५/- एवढी करण्यात आली होती.
- शासनाने "ब्रेक द चेन" अंतर्गत कडक निर्बंध लागू केल्याने दि.१५.०४.२०२१ ते दि. ३०.०९.२०२१ या कालावधीत एकूण २,७०,५१,४७२ शिवभोजन थाळी लाभार्थ्यांना नि:शुल्क उपलब्ध करुन देण्यात आली. या कालावधीत शिवभोजन थाळी दिड पट वाढविण्यात आली.

- जुलै २०२१ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे पूरग्रस्त भागात शिवभोजन केंद्रांवर दुप्पट क्षमतेने आणि ऑफलाइन पद्धतीने शिवभोजन थाळीचे वाटप करण्यात आले.
- दिनांक २८.०९.२०२१ च्या शासन निर्णयानुसार, ०१ ऑक्टोबर, २०२१ पासून, शिवभोजन थाळीची किंमत पूर्वीप्रमाणे प्रति थाळी रु.१०/- इतकी वाढविण्यात आली आहे. तसेच शिवभोजन केद्रांच्या थाळ्यांची संख्या जी दीड पट वाढविण्यात आली होती, ती त्यांच्या मूळ थाळीमध्ये पुनर्संचयित करण्यात आली आहे.
- शिव भोजन योजना सुरू झाल्यापासून दिनांक ३०.११.२०२१ पर्यंत एकूण ७,३१,६५,३७६ शिवभोजन थाळ्या लाभार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. सध्या राज्यात १,४१७ शिवभोजन केंद्रे कार्यरत आहेत.

## १०) साखर

**I) नियंत्रित साखर वितरण पध्दत:-**

१) नियंत्रित भावाने जनतेस सवलतीच्या दराने साखर मिळावी या हेतूने दिनांक १७.१२.१९७९ पासून केंद्र शासनाने साखरेवर अंशत: नियंत्रण आणले. त्यायोगे प्राप्त होणारी लेव्ही साखर सार्वजनिक वितरण व्यवस्थेद्वारा वाटप करण्यात येत होती. जानेवारी,१९९६ पासून, राज्याच्या सन १९९१ च्या जनगणनेच्या आधारे दरमाणशी ४२५ ग्रॅम प्रमाणे एकूण ३३,५५० मे.टन इतके मासिक नियतन केंद्र शासनाकडून मिळत होते. त्यानुसार एप्रिल,२००० पासून मार्च,१९९९ ची अंदाजित लोकसंख्या विचारात घेऊन व आयकरपात्र शिधापत्रिकाधारक व त्यांचे कुटुंबिय वगळून राज्यातील ७.९३ कोटी लोकसंख्येस दरमाणशी ४२५ ग्रॅमप्रमाणे ३३,७६३.८ मे.टन इतके मासिक नियतन केंद्र शासनाकडून राज्यास मिळत होते.

२) **नियंत्रित साखर वाटपाबाबत फेब्रुवारी, २००१ पासून केंद्र शासनाने खालीलप्रमाणे निर्णय** घेतले आहेत :-

अ. साखर उत्पादक कारखान्यांकडून यापूर्वी **३०%** नियंत्रित साखर वसूल करण्यात येत होती. दिनांक ०१.०२.२००१ पासून हे प्रमाण **१५%** करण्यात आले. त्यानंतर केंद्र शासनाने दिनांक **०१.०३. २००२ रोजी किंवा त्यानंतर उत्पादित केलेल्या साखरेचे हे प्रमाण ९०% खुली व १०% लेव्ही असे केले आहे.**

आ. सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत **फक्त दारिद्रय रेषेखालील व्यक्तींनाच** नियंत्रित साखरेचे वितरण करण्यात येते.

इ. सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत देण्यात येणारी नियंत्रित साखर ०१.०३.२००० ची बी.पी.एल. शिधापत्रिकाधारकांच्या कुटुंबियांची अंदाजित लोकसंख्या विचारात घेऊन देण्यात येते.

ई. सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत दारिद्रय रेषेखालील व्यक्तींना अधिक साखर मिळावी याकरीता प्रत्येक महिन्यात प्रती माणशी ४२५ ग्रॅम ऐवजी ५०० **ग्रॅम परिमाण ठरविण्यात आले आहे.** तसेच सणासुदीसाठी माहे ऑगस्ट/सप्टेंबर व ऑक्टोबर / From 1st of February, २००१, नोव्हेंबर या दोन महिन्यांकरीता प्रत्येक माणशी ६६० ग्रॅम एवढी साखर देण्यात येते.

II) साखर वितरणाची सुधारित पध्दत :-

१) डॉ. सी. रंगराजन समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने दि.१७.०५.२०१३ च्या आदेशान्वये साखरेवरील नियंत्रण हटविल्यामुळे साखर खुल्या बाजारातून खरेदी करून लाभार्थ्यांना वितरित करावयाची आहे. यासाठी राज्य शासनाकडून खुल्या बाजारातून खरेदी करण्यात येणाऱ्या साखरेसाठी व अनुषंगिक खर्चासाठी केंद्र शासन प्रति क्विंटल रू.१८५०/- एवढे अनुदान उपलब्ध करुन देते

२) सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत राज्य शासन NCDEX SPOT EXCHANGE LTD. आता नामकरण एनसीडीईएक्स ई-मार्केटस् लि. मार्फत जिल्हानिहाय ई-लिलावाद्वारे साखर ऑनलाईन खरेदी करून नियमितपणे तालुकानिहाय वितरण करण्यात येते.

३) शासन निर्णय क्र. साखर-१११७/प्र.क्र.९१/ना.पु.१९, दि. २५ जुलै, २०१७ च्या शासन निर्णयान्वये तीन महिन्यासाठी एकदाच खुल्या बाजारातून ई-लिलावाद्वारे साखर खरेदी केली जाते.

४) केंद्र शासनाच्या दि.१ जुन, २०१७ च्या मार्गदर्शक सूचनेनुसार फक्त अंत्योदय अन्न योजनेतील लाभार्थ्यांसाठीच प्रती कुटुंब १ किलो याप्रमाणे साखर वाटप करण्यात येते.

५) शासन निर्णय क्र. साखर १११७/प्र.क्र.६५/ना.पु.१९, दि.१५ सप्टेंबर, २०१७ अन्वये जून २०१७ या महिन्यापासून अंत्योदय लाभार्थ्यांना प्रति कुटूंब १ किलो दरमहा रु.२०/- प्रति किलो याप्रमाणे साखर वितरीत करण्याबाबत राज्य शासनाने निश्चित केले आहे.

६) साखरेच्या उपरोक्त किंमतीमध्ये वाहतूक, मालाची चढ-उतार, लागू असल्यास कर, इत्यादीचा समावेश आहे. या किंमतीशिवाय राज्य शासनाकडून पुरवठादारास व NCDEX E-Markets Ltd. या संस्थेस कोणताही कमिशन देण्यात येत नाही.

११) महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम -२०१५

राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरिता महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम-२०१५ हा दि. २८.०४.२०१५ रोजी लागू करण्यात आला आहे. या नियमानुसार अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या पुरवठा विभागांतर्गत नागरिकांना पुरविण्यात येणा-या ७ सेवा व वैधमापनशास्त्र यंत्रणेमार्फत पुरविण्यात येणा-या ९ सेवा निश्चित करुन या सेवासंदर्भातील अधिसूचना अनुक्रमे दिनांक १४ ऑक्टोबर, २०१५, दि.३१ ऑगस्ट, २०१६ व २५ ऑक्टोबर, २०१६ रोजी निर्गमित करण्यात आल्या आहे. सदर अधिसूचनांच्या अनुषंगाने अनुक्रमे दि.२२ जून, २०१६ व ३० सप्टेंबर, २०१६ च्या शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम-२०१५ (सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.५ )च्या कलम ३(१) अन्वये प्राप्त अधिकारानुसार अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या अधिनस्त वैधमापनशास्त्र यंत्रणेतंर्गत मैत्री कक्षामार्फत पात्र उद्योगांना पुरविण्यात येत असलेल्या लोकसेवा प्राप्त करण्यासाठी जे अर्ज उद्योग विभागाच्या शासन निर्णय क्र.मेइम२०१५/प्र.क्र.१०५/उद्योग-८, दि.११.०२.२०१६ अन्वये स्थापित करण्यात आलेल्या

मैत्री कक्षाकडे प्राप्त होतील अशा दोन सेवासंदर्भातील अधिसूचना २५ ऑक्टोबर, २०१६ रोजी निर्गमित करण्यात आली आहे. सदर अधिसूचना व शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागामार्फत महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम-२०१५ अंतर्गत जनतेस पुरविण्यात येणा-या अधिसूचित सेवांची बृहत यादी ( Master List ) दि.३० एप्रिल, २०२१ रोजी निर्गमित करण्यात आली आहे. सदर बृहत यादी ( Master List ) विभागाच्या www.mahafood.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

१२. जिल्हा तक्रार निवारण अधिकारी:-

दिनांक ७ एप्रिल, २०१७ च्या अधिसुचनेन्वये राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत राज्यातील जनतेकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी सदर अधिनियमाच्या कलम १५ अन्वये संबंधित जिल्ह्यांतील अन्नसुरक्षा योजनेशी संबंधित नसलेले "अपर जिल्हाधिकारी" यांची "जिल्हा तक्रार निवारण अधिकारी" म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.

मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रातील प्राप्त तक्रारीचे निराकरण करण्यासाठी सदर शिधावाटप क्षेत्र ज्या महसूली जिल्ह्यांमध्ये आहे, त्या मुंबई, मुंबई उपनगर व ठाणे या जिल्ह्यांतील "अपर जिल्हाधिकारी" यांची संबंधित कार्यक्षेत्राचे जिल्हा तक्रार निवारण अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

## विवरणपत्र-१ :- परवाना शुल्क

### परवाना फी व व्यापाऱ्याकडील साठा मर्यादा याबाबतचा तपशील

| अ. क्र. | आदेशाचे नाव | परवाना प्रकार | परवाना फी रुपये | अनामत रक्कम रुपये | नूतनीकरण शुल्क रुपये | दुय्यम परवाना फी रुपये | व्यापाऱ्याने परवाना केव्हा काढावा | साठा मर्यादा | परवाना देणारी यंत्रणा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | महाराष्ट्र अनुसूचित वस्तू घाऊक व्यापार परवाना आदेश, २०१५ | घाऊक | १,००० (प्रती वस्तू) | ५,००० | ५०० (प्रती वस्तू) | १०० (प्रती वस्तू) | **अन्नधान्य :** ५० क्विंटल वा त्यापेक्षा जास्त अन्नधान्याचा घाऊक व्यवसाय करावयाचा असल्यास. | **दि. ०३ जून, २०२२ ची स्थिती :** | **<u>मुंबई शिधावाटप क्षेत्र</u>:** नियंत्रक शिधावाटप यांचेकडून नियुक्त करण्यात आलेले सहायक नियंत्रक शिधावाटप वा त्यांच्यापेक्षा वरीष्ठ दर्जाचे अधिकारी<br><br>**<u>इतर क्षेत्र</u>** : राज्य शासन किंवा जिल्हाधिकारी यांच्याकडून नियुक्त करण्यात आलेले तहसिलदार वा त्यांच्यापेक्षा वरीष्ठ दर्जाचे अधिकारी तसेच अन्नधान्य वितरण अधिकारी, सोलापूर/नागपूर/पुणे |
| | | | | | | | **साखर :** १० क्विंटल वा त्यापेक्षा जास्त साखरेचा घाऊक व्यवसाय करावयाचा असल्यास. (नोंदणीकृत साखर उत्पादन उद्योग वगळता) | १. अन्नधान्य, साखर, गुळ व खांडेसरी, हायड्रोजनेटेड व्हेजिटेबल ऑईल, डाळी यासाठी साठा मर्यादा लागू नाही. | |
| | | | | | | | **गुळ व खांडेसरी :** २५० क्विंटल वा त्यापेक्षा जास्त गुळ व खांडेसरीचा घाऊक व्यवसाय करावयाचा असल्यास. | | |
| | | | | | | | **हायड्रोजनेटेड व्हेजिटेबल ऑईल :** १५० किलोग्राम वा त्यापेक्षा जास्त हायड्रोजनेटेड व्हेजिटेबल ऑईलचा घाऊक व्यवसाय करावयाचा असल्यास. | | |
| | | | | | | | **डाळी :** ५ क्विंटल वा त्यापेक्षा जास्त डाळींचा घाऊक व्यवसाय करावयाचा असल्यास. | | |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | **खाद्यतेल व तेलबिया** : २० क्विंटल वा त्यापेक्षा जास्त खाद्यतेल व तेलबियांचा घाऊक व्यवसाय करावयाचा असल्यास. | २. दि. ३१ डिसेंबर, २०२२ पर्यंत<br>अ) खाद्यतेल - ५०० क्विंटलची मर्यादा;<br>ब) खाद्य तेलबिया - २,००० क्विंटलची मर्यादा. | |
| २ | महाराष्ट्र अनुसूचित वस्तू किरकोळ व्यापार परवाना आदेश, १९७९ | किरकोळ | केरोसिन वगळता इतर वस्तू | २०० | ५०० | १०० | २० | **अन्नधान्य** : महानगरपालिका क्षेत्रात १०० क्विंटल व इतरत्र ५० क्विंटलपेक्षा जास्त अन्नधान्याचा किरकोळ व्यवसाय करावयाचा असल्यास. | दि. ०३ जून, २०२२ ची स्थिती : | <u>मुंबई शिधावाटप क्षेत्र</u>: नियंत्रक शिधावाटप यांचेकडून नियुक्त करण्यात आलेले सहायक नियंत्रक शिधावाटप वा त्यांच्यापेक्षा वरीष्ठ दर्जाचे अधिकारी<br><br><u>इतर क्षेत्र</u> : राज्य शासन किंवा जिल्हाधिकारी यांच्याकडून नियुक्त करण्यात आलेले तहसिलदार वा त्यांच्यापेक्षा वरीष्ठ दर्जाचे अधिकारी तसेच अन्नधान्य वितरण अधिकारी,<br>सोलापूर/नागपूर/पुणे |
| | | | | | | | | **साखर** : १० क्विंटल वा त्यापेक्षा जास्त साखरेचा किरकोळ व्यवसाय करावयाचा असल्यास. (नोंदणीकृत साखर उत्पादन उद्योग वगळता) | १. अन्नधान्य, साखर, गुळ व खांडेसरी, डाळी यासाठी साठा मर्यादा लागू नाही. | |
| | | | | | | | | **गुळ व खांडेसरी** : २५ क्विंटल वा त्यापेक्षा जास्त गुळ व खांडेसरीचा किरकोळ व्यवसाय करावयाचा असल्यास. | | |
| | | | | | | | | **डाळी** : २० क्विंटल वा त्यापेक्षा जास्त डाळींचा किरकोळ व्यवसाय करावयाचा असल्यास. | | |
| | | | | | | | | **खाद्यतेल** : १५ क्विंटल वा त्यापेक्षा जास्त खाद्यतेलाचा किरकोळ व्यवसाय करावयाचा असल्यास. | २. दि. ३१ डिसेंबर, २०२२ पर्यंत खाद्यतेल - ३० क्विंटलची मर्यादा. | |
| | | | | | | | | **खाद्यतेल बिया** : ३० क्विंटल वा त्यापेक्षा जास्त खाद्यतेलबियांचा किरकोळ व्यवसाय करावयाचा असल्यास. | २. दि. ३१ डिसेंबर, २०२२ पर्यंत खाद्य तेलबिया - १०० क्विंटलची मर्यादा. | |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | केरोसिन | ५०० | ३,००० | २५० | २० | **केरोसिन** : केरोसिन विक्री करणा-या व्यापा-यांना किरकोळ व्यवसाय करावयाचा असल्यास. | | |

विवरणपत्र-२

साठा मर्यादा

(दि. ३१ डिसेंबर, २०२२ पर्यंत लागू)

| अ.क्र. | जीवनावश्यक वस्तूचे नाव | किरकोळ | घाऊक | मोठे ग्राहक (**Bulk Consumers**) (**Big chain retailers shops**) | | प्रक्रियक (**Processor**) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | **Retail Outlets** | **Depot** | |
| १. | खाद्यतेल | ३० क्विंटल | ५०० क्विंटल | ३० क्विंटल | १००० क्विंटल | ९० दिवसांची साठा क्षमता |
| २. | खाद्य तेलबिया | १०० क्विंटल | २००० क्विंटल | - - | | ९० दिवसांचे खाद्यतेलाचे उत्पादन (As per daily input production capacity) |

## विवरणपत्र-३

## परवाना शुल्क

| अ. क्र. | आदेशाचे नाव | प्रकार | परवाना फी रुपये | अनामत रक्कम रुपये | नूतनीकरण शुल्क रुपये | जीवनावश्यक वस्तू |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | महाराष्ट्र अनुसूचित वस्तू घाऊक व्यापार परवाना आदेश, २०१५ | घाऊक | १००० | ५००० | ५०० | प्रस्तुत आदेशांच्या अनुसूची क्रमांक २ मध्ये नमूद केलेल्या वस्तू |
| २ | महाराष्ट्र अनुसूचित वस्तू किरकोळ व्यापार परवाना आदेश, १९७९ | किरकोळ | २०० | ५०० | १०० | |

विवरणपत्र-४

सॉल्वंट व नाफ्ता अनुज्ञप्ती खालील आदेशांन्वये मंजूर करण्यात येत आहे.

१. महाराष्ट्र सॉल्वंट, रॅफिनेट व स्लॉप (अनुज्ञापन) आदेश, २००७ - दि.२५ जानेवारी, २००७

२. महाराष्ट्र नाफ्ता (अनुज्ञापन) आदेश, २००९ - दि.१४ जानेवारी, २००९

| अ.क्र. | | सॉल्वंट व नाफ्ता | |
|---|---|---|---|
| १ | अनुज्ञप्ती प्रकार | सॉल्वंट | नाफ्ता |
| | | उपभोक्ता, डिलर,ट्रेडर व फेरविक्रेता, साठवणूक व नोंदणीकृत उपभोक्ता | उपभोक्ता व साठवणूक |
| २ | अनुज्ञप्ती प्राधीकरण | मुंबई व ठाणे शिधावाटप क्षेत्रात नियंत्रक शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई.<br>इतर जिल्हयात जिल्हाधिकारी व अपर जिल्हाधिकारी | |
| ३ | अनुज्ञप्ती प्रतिभूती ठेव | (१) दरमहा १०० कि.ली. | रु.१०,०००/- |
| | | (२) दरमहा १०१ कि.ली ते २०० कि.ली. | रु.२०,०००/- |
| | | (३) दरमहा २०१ कि.ली. ते ५०० कि.ली. | रु.३०,०००/- |
| | | (४) दरमहा ५०१ कि.ली. ते १००० कि.ली. | रु.७५,०००/- |
| | | (५) दरमहा १००१ कि.ली. ते २००० कि.ली. | रु.१,५०,०००/- |
| | | (६) दरमहा २००१ ते ५००० कि.ली. | रु.३,००,०००/- |
| | | (७) दरमहा ५००१ कि.ली. ते १०००० कि.ली. | रु.५,००,०००/- |
| | | (८) दरमहा १०००१ कि.ली. किंवा त्यापेक्षा अधिक | रु.७,५०,०००/- |
| | | (९) नोंदणीकृत उपभोक्ता | रु.५०००/- |
| ४ | अनुज्ञप्ती कालावधी | अनुज्ञप्ती मंजूर केल्यापासून १ वर्ष | |
| | | नोंदणीकृत उपभोक्तासाठी ५ वर्ष | |
| ५ | अनुज्ञप्ती नुतनीकरण शुल्क | रु.१०००/ | |
| ६ | अनुज्ञप्ती नुतनीकरणाचा कालावधी | एकावेळी २ वर्षाकरिता | |
| | | नोंदणीकृत उपभोक्तासाठी ५ वर्षाकरिता | |
| ७ | अनुज्ञप्ती अर्जावर निर्णय कालावधी | परिपूर्ण स्वरुपात अर्ज व कागदपत्रांसह प्रस्ताव अनुज्ञापक प्राधीका-याकडे प्राप्त झाल्यानंतर कामाचे ४५ दिवस | |
| ८ | अपिल व पुनरिक्षण | मुंबई व ठाणे शिधावाटप क्षेत्रात शासन व इतर जिल्हयात विभागीय आयुक्त | |

# भाग-२

## १) वैध मापन शास्त्र यंत्रणा

उदिदष्टे :- ग्राहकाला उचित दर्जाच्या, उचित मापाच्या वस्तु मिळतील, याची खात्री करणे.

संरचना :-

मंत्री
↓
राज्यमंत्री
↓
सचिव
↓
नियंत्रक, वैधमापन शास्त्र, मुंबई.

वैध मापन शास्त्र यंत्रणेमार्फत खालील प्रमुख अधिनियम व नियमांची अंमलबजावणी करण्यात येते:

१) वैध मापन शास्त्र अधिनियम, २००९.
२) वैध मापन शास्त्र (आवेष्टित वस्तु) नियम, २०११.
३) वैध मापन शास्त्र (सर्वसाधारण) नियम, २०११.
४) महाराष्ट्र वैध मापन शास्त्र (अंमलबजावणी) नियम , २०११
५) वैधमापन शास्त्र (नमुना मान्यता) नियम, २०११.
६) वैधमापन शास्त्र (न्युमरिक) नियम, २०११.
७) भारतीय विधीक माप संस्था नियम, २०११.

उपरोक्त अधिनियम/नियमांतील काही ठळक बाबी पुढीलप्रमाणे आहेत:-

(अ) **वजन वा मापांची पडताळणी व मुद्रांकन :-** व्यापार उदिम व सुरक्षेच्या क्षेत्रातील वजन माप उपयोगकर्त्याकडील वजन व माप यांची नियतकालीक पडताळणी व मुद्रांकन करुन घेणे उपयोगकर्त्यास बंधनकारक आहे.

(आ) **वजन माप विषयक परवाने :-** उपरोक्त अधिनियम /नियमातील तरतुदींनुसार विहीत परवाना असल्याखेरीज कोणासही वजन वा मापांचे उत्पादन, दुरुस्ती व विक्री करता येत नाही. यासाठी खालील परवान्यांची आवश्यकता असते.

a) **उत्पादक परवाना व त्यांचे नुतनीकरण -** कोणत्याही वजन वा माप यांचे उत्पादन करण्यासाठी उत्पादक परवाना घेणे आवश्यक आहे. सदर परवाना नियंत्रक, वैध मापन शास्त्र कार्यालयाकडून देण्यात येतो. तसेच या परवान्यांचे नुतनीकरण याच कार्यालयाकडून ऑनलाईन पध्दतीने करण्यात येते.

b) **दुरुस्ती परवाना :-** कोणत्याही वजन वा माप यांची दुरुस्ती करण्यासाठी दुरुस्तक परवाना घेणे आवश्यक आहे. दुरुस्तीचे कार्यक्षेत्र एकापेक्षा जास्त प्रादेशिक विभाग असल्यास सदर परवाना नियंत्रक, वैध मापन शास्त्र कार्यालयाकडून देण्यात येतो. दुरुस्तीचे कार्यक्षेत्र फक्त प्रादेशिक विभाग असल्यास परवाना संबंधित प्रादेशिक विभागाचे सहनियंत्रक, यांचेकडून देण्यात येतो.

c) **दुरुस्ती परवाना नुतनीकरण :-** नियंत्रक कार्यालयाने दिलेल्या फक्त दुरुस्ती परवान्यांचे नुतनीकरण सदर परवानाधारकाची कार्यशाळा ज्या प्रादेशिक विभागात आहे त्या प्रादेशिक विभागाचे सहनियंत्रक यांचेकडून केले जाते. प्रादेशिक विभाग सह नियंत्रक यांनी दिलेल्या परवान्याचे नुतनीकरण सदर नरवानाधारकाची कार्यशाळा ज्या जिल्हयामध्ये आहे त्या जिल्हयाचे उप नियंत्रक यांचेकडून केले जाते. सदर नुतनीकरण आता ऑनलाईन पध्दतीने स्वयंनुतनीकरण केले जाते.

d) **विक्री परवाना व त्यांची नुतनीकरण :-** अर्जदाराचे नोंदणीकृत कार्यालय ज्या जिल्हयात आहे त्या जिल्हयाचे उप नियंत्रक याचेकडून विक्री परवाना देण्यात येतो तसेच या परवान्याचे नुतनीकरणही ऑनलाईन व स्वयंनुतनीकरण पध्दतीने त्यांचेकडूनच करण्यात येते.

इच्छूक व्यक्तीनी परवाना मिळविण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांकडे अर्ज करावयाचा असतो. अर्जाच्या छाननी नंतर जर इच्छुक व्यक्ती परवाना मिळण्यास पात्र आढळली तर त्यास परवाना दिला जातो. वरील सर्व परवाने सुरुवातीस एक कॅलेंडर वर्षासाठी देण्यात येतात. परवान्याचे नुतनीकरण करण्यासाठी ऑनलाईन अर्ज परवान्याची मुदत संपण्यापूर्वी ३० दिवस अगोदर करावा लागतो. अन्यथा परवान्याच्या विधीग्राहय कालावधीत त्यास नियमित शुल्कासह ५०टक्के अतिरिक्त शुल्क आकारुन अर्ज करता येतो. त्यापुढील तीन महिन्यात दुप्पट शुल्क भरुन नियंत्रकाच्या मान्यतेने परवान्याचे नुतनीकरण करण्यासाठी अर्ज करता येतो, वाढीव मुदत संपेपर्यंत परवानाधारकाने नुतनीकरणासाठी अर्ज केला नाही तर त्याचा परवाना आपोआप रदद होतो.

e) **आवेष्टित वस्तु उत्पादक/आवेष्टक/आयातदार नोदणी :-** आवेष्टित वस्तु उत्पादन/आवेष्टन/आयात करणाऱ्या सर्वांना याबाबतची नोंदणी करणे बंधनकारक आहे. यांची नोंदणी नियंत्रक कार्यालयात ऑनलाईन पध्दतीने करण्यात येते.

f) आवेष्टित वस्तु उत्पादक/आवेष्टक/ आयातदार यांच्या संक्षिप्त पत्याची नोंदणी करणे- आवेष्टिक वस्तू उत्पादक/आवेष्टक/आयातदार यांच्या संक्षिप्त पत्यांची नोंदणी नियंत्रक कार्यालयात ऑनलाईन पध्दतीने करण्यात यते.

(इ) **वजन व माप आणि आवेष्टित वस्तू नियम विषयक तरतूदींचा भंग :-** खोटया वजनमापांचा वापर, कमी माल देणे, अधिक मालाची मागणी करणे. आवेष्टित वस्तुंची छापील किंमतीपेक्षा जास्त दराने विक्रि करणे, त्यावरील मूळ किंमतीमध्ये खाडाखोड करणे व पाकीटात माल कमी आढळणे, आवेष्टित वस्तुवर आवश्यक अदघोषणा न छापणे इत्यादी बाबींमध्ये ग्राहकांची फसवणूक होत असल्याचे आढळून

आल्यास वा वैध मापन शास्त्र विषयक तरतूदींचा भंग होत असल्यास निरिक्षक/सहायक नियंत्रक संबंधिताविरुध्द कारवाई करतात. ग्राहकास व सर्वसाधारण जनतेस या बाबी आढळून आल्यास अथवा यबाबतीत तक्रारी असल्यास कार्यालयीन वेळेत तक्रार नोंदविण्यासाठी यंत्रणेने स्वतंत्र दूरध्वनी उपलब्ध करुन दिलेला आहे. या व्यतिरिक्त माहितीसाठी व तक्रार नोंदविण्यासाठी स्वतंत्र legal metrology.maharastra.gov.in हा संकेत स्थळ ग्राहकासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.जिल्हापातळीवर तक्रार नोंदविण्यासाठी जिल्हा उप नियंत्रक यांचे दूरध्वनी क्रमांक संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

(ई) वैधमापनशास्त्र यंत्रणेंतर्गत पात्र नागरिकांना पुरविण्यात येत असलेल्या लोकसेवा, नियत कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम आणि द्वितीय अपिल प्राधिकारी याबाबतच्या बाबी खालीलप्रमाणे अधिसूचित केलेल्या आहेत:-

| अ. क्र. | लोकसेवेचा तपशील | लोकसेवा साठी विहीत कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिल अधिकारी | द्वितीय अपिल प्राधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | वजने-मापे उत्पादकांना परवाना | ४५ दिवस | नियंत्रक, वैधमापन शास्त्र | सह सचिव/ उप सचिव, अ.ना.पु. व ग्रा.सं.वि. | सचिव/प्रधान सचिव, अ.ना.पु. व ग्रा.सं.वि. |
| २ | वजने-मापे उत्पादक परवाना नुतनीकरण | ३० दिवस | नियंत्रक, वैधमापन शास्त्र | सह सचिव/ उप सचिव, अ.ना.पु. व ग्रा.सं.वि. | सचिव/प्रधान सचिव, अ.ना.पु. व ग्रा.सं.वि. |
| ३ | वजने-मापे विक्रेत्यांना परवाना | ४५ दिवस | १) नियंत्रक, वैधमापन शास्त्र<br>२) प्रादेशिक उप नियंत्रक / जिल्हा सहायक नियंत्रक | १) सह सचिव/उप सचिव, अ.ना.पु. व ग्रा.सं.वि.<br>२) नियंत्रक , वैधमापन शास्त्र | १) सचिव/प्रधान सचिव, अ.ना.पु. व ग्रा.सं.वि.<br>२) सचिव/प्रधान सचिव, अ.ना.पु. व ग्रा.सं.वि. |
| ४ | वजने-मापे विक्रेता परवाना नुतनीकरण | ३० व स | १) नियंत्रक, वैधमापन शास्त्र<br>२) प्रादेशिक उप नियंत्रक / जिल्हा सहायक नियंत्रक | १) सह सचिव/उप सचिव, अ.ना.पु. व ग्रा.सं.वि.<br>२) नियंत्रक , वैधमापन शास्त्र | १) सचिव/प्रधान सचिव, अ.ना.पु. व ग्रा.सं.वि.<br>२) सचिव/प्रधान सचिव, अ.ना.पु. व ग्रा.सं.वि. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | वजने-मापे दुरुस्तकांना परवाना | ४५ व स | १) नियंत्रक, वैधमापन शास्त्र<br><br>२) प्रादेशिक उप नियंत्रक | १) सह सचिव/उप सचिव, अ.ना.पु. व ग्रा.सं.वि.<br>२) नियंत्रक , वैधमापन शास्त्र | १) सचिव/प्रधान सचिव, अ.ना.पु. व ग्रा.सं.वि.<br>२) सचिव/प्रधान सचिव, अ.ना.पु. व ग्रा.सं.वि. |
| ६ | वजने-मापे दुरुस्तक परवाना नुतनीकरण | ३० दिवस | १) नियंत्रक, वैधमापन शास्त्र<br><br>२) प्रादेशिक उप नियंत्रक / जिल्हा सहायक नियंत्रक | १) सह सचिव/उप सचिव, अ.ना.पु. व ग्रा.सं.वि.<br>२) नियंत्रक , वैधमापन शास्त्र | १) सचिव/प्रधान सचिव, अ.ना.पु. व ग्रा.सं.वि.<br>२) सचिव/प्रधान सचिव, अ.ना.पु. व ग्रा.सं.वि. |
| ७ | आवेष्टक नोंदणी प्रमाणपत्र | ३० दिवस | नियंत्रक, वैधमापन शास्त्र | सह सचिव/उप सचिव, अ.ना.पु. व ग्रा.सं.वि. | सचिव/प्रधान सचिव, अ.ना.पु. व ग्रा.सं.वि. |
| ८ | नामनिर्देशन नोंदणी प्रमाणपत्र | ३० दिवस | नियंत्रक, वैधमापन शास्त्र | सह सचिव/उप सचिव, अ.ना.पु. व ग्रा.सं.वि. | सचिव/प्रधान सचिव, अ.ना.पु. व ग्रा.सं.वि. |
| ९ | वैधमापनशास्त्र अधिनियम २००९ अंतर्गत वजन व मापे यांचे मुद्रांकन, पडताळणी व प्रमाणपत्र देणे. | कार्यालया अंतर्गत ०३ दिवस व कार्यालया बाहेर ३५ दिवस | निरिक्षक वैधमापनशास्त्र | सहायक नियंत्रक वैधमापनशास्त्र | उपनियंत्रक वैधमापनशास्त्र |

# भाग-३

## २) ग्राहक संरक्षण विभाग

उद्दिष्ट :- ग्राहकांच्या तक्रारींचे निवारण करून त्यांना न्याय मिळवून देणे.

संरचना :-

राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग
↓
जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग

(अ) राज्य ग्राहक संरक्षण परिषद :-

१) राज्यातील ग्राहकांच्या हिताचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी ग्राहक संरक्षण अधिनियम २०१९नुसार राज्य ग्राहक संरक्षण परिषदेची स्थापना करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

२) शासनाच्या दि. १८/०२/२०२२ च्या अधिसूचनेन्वये राज्य ग्राहक संरक्षण परिषदेची सदस्य संख्या ५२ इतकी आहे.

३) मा. मंत्री (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग) हे या परिषदेचे अध्यक्ष आहेत.

४) राज्य ग्राहक ग्राहक संरक्षण परिषदेचा कालावधी ३ वर्षाचा आहे.

५) राज्य ग्राहक संरक्षण परिषदेवर ५२ सदस्य आहेत. यातील २२ सदस्य शासकीय असून, उर्वरित ३० सदस्य अशासकीय आहे.

(आ) जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद :-

१) जिल्हा स्तरावरील ग्राहकांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी जिल्हास्तरीय ग्राहक संरक्षण परिषदेची स्थापना करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

२) जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेचे अध्यक्ष जिल्हयाचे जिल्हाधिकारी आहेत.

३) शासन अधिसूचना दि. १८/०२/२०२२ अन्वये जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेमध्ये वेगवेगळया स्तरावरील ४२ (१४ शासकीय व २८ अशासकीय) सदस्यांचा समावेश आहे.

४) जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची मुदत तीन वर्षे इतकी आहे.

इ) ग्राहक संरक्षण अधिनियम, २०१९ ची अंमलबजावणी:-

१) ग्राहक संरक्षण अधिनियम, २०१९ दि.२०.०७.२०२० पासून लागू झाला असून तत्पूर्वीचा ग्राहक संरक्षण अधिनियम, १९८६ व्यपगत झाला आहे.

२) ग्राहकांच्या हिताचे संरक्षण करण्याच्या हेतूने समयोचित व प्रभावी प्रशासनासाठी आणि ग्राहकांच्या विवादाचे निवारणासाठी प्राधिकरण स्थापित करणेची तरतूद या अधिनियमामध्ये करण्यात आली आहे.

३) या अधिनिमान्वये मोबदला अदा करुन कोणतीही वस्तू किंवा सेवा online किंवा offline पध्दतीने घेणारी व्यक्ती ही “ग्राहक” समजली जाते.

४) या अधिनियमामध्ये मध्यस्थी कक्ष, दिशाभूल करण्याऱ्या जाहिराती, उत्पादनाचे उत्तरदायित्व,ई-कॉमर्स/ इलेक्ट्रानिक सेवा प्रदाता /थेट विक्री, केंद्रिय ग्राहक संरक्षण प्राधिकरण इत्यादी बाबत तरतूदी नव्याने समाविष्ट आहेत.

५) या अधिनिमयामध्ये राष्ट्रीय,राज्य आणि जिल्हा पातळीवर तक्रार निवारण आयोगाच्या स्थापनेची तरतूद आहे. सदर आयोग पूर्णत: ग्राहक विवादाचे निराकरण करण्यासाठी स्थापन करण्यात आले असून त्यांच्या न्यायक्षेत्र स्पष्ट करण्यात आले आहे.

१) राष्ट्रीय ग्राहक तक्रार निवारण आयोग : - राष्ट्रीय पातळीवर.
२) राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग : - राज्य स्तरावर.
३) जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग : - जिल्हा स्तरावर

राज्य स्तरावरील व जिल्हा स्तरावरील यंत्रणांबाबतचा तपशील थोडक्यात पुढीलप्रमाणे आहे:-

| अ.क्र. | मुद्दा | राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग | जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग |
|---|---|---|---|
| १ | मुख्यालय | मुंबई, (नागपूर व औरंगाबाद येथे प्रादेशिक खंडपीठे ) | प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी (एकूण ४० जिल्हा आयोग) |
| २ | दाखल करण्यात येणाऱ्या दाव्यामधील किंमतीची मर्यादा | दि. २०.०७.२०२० पासून रु. १.०० कोटी ते १०.०० कोटीपर्यंत इतकी होती. तथापि, दि.३०.१२.२०२१ च्या केंद्र अधिसूचनेनुसार यामध्ये बदल झाल्याने आताची मर्यादा रु.५०.०० लक्षापेक्षा जास्त परंतु रु. २.०० कोटी इतकी झाली आहे. | दि. २०.०७.२०२० पासून रु. १ कोटीपर्यत इतकी होती. तथापि, दि.३०.१२.२०२१ च्या केंद्र अधिसूचनेनुसार यामध्ये बदल झाल्याने आताची मर्यादा रु.५०.०० लक्ष पर्यंत झाली आहे. |
| ३ | e-dakhil सुविधेव्दारे ऑनलाईन पध्दतीने edaakhil.nic.in या संकेतस्थळावर आयोगात तक्रार दाखल करात येते. | | |
| ४. | पाच लक्ष पर्यंतच्या दाव्यांसाठी शुल्क अदा करावे लागत नाही. | | |

ई) राज्य ग्राहक हेल्पलाईन :-

राज्य शासनाने कंझ्युमर गाईडन्स सोसायटी ऑफ इंडिया, मुंबई या संस्थेच्या सहकार्याने दि. १५ सप्टेंबर, २०११ पासून **"राज्य ग्राहक हेल्पलाईन"** कार्यान्वित करण्यात आली आहे.

ग्राहकांना विनाशुल्क टेलीफोनव्दारे त्यांच्या समस्येबद्दल असलेली माहिती/सल्ला/मार्गदर्शन मिळण्यासाठी राज्य ग्राहक हेल्पलाईन सुरु करण्यात आली आहे. या हेल्पलाईनव्दारे राज्यातील ग्राहकांना मराठी, इंग्रजी व हिंदी भाषेमध्ये सल्ला देण्यात येत आहे. **राज्य ग्राहक हेल्पलाईनचा टोल फ्री क्र. १८०० २२ २२६२ असा आहे.**